cmyk



दैनिक

# राज्य लोकतंत्र



www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड – महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-२०२ | मंगळवार दि.१३ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## माळ तिसरी



तृतीयेचे दिवशी अंबे शृंगार मांडिला हो ।।
मळवट पारतळ चोळी कंठी हार मुक्ताफळां हो ।।
कंठींचीं पदकें कांसे पीतांबर पिवळा हो ।।
अष्टभुजा मिरविती अंबे सुंदर दिसे लीला हो ।।३।।
उदो बोला उदो अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय महिमा वर्णू तिचा हो ।।

# राज्यावर दुष्काळाचे भीषण संकट

## शेतकरी-शेतमजुरांसाठी पुढील ८ महिन्यांचे नियोजन, पिण्याच्या पाण्याला पहिले प्राधान्य !

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांसमोर उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आगामी सहा ते आठ महिने या घटकांना आधार देण्यासाठी रोजगारनिर्मिती, अन्नधान्य वितरण, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि पशुधनासाठी चारा-पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे. राज्यातील उपलब्ध पाणीसाठ्याचे पहिले आरक्षण पिण्याच्या पाण्यासाठी करण्यात आले असून, दुष्काळी उपाययोजनांची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**



केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबत वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राज्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतीचे नुकसान, पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि आगामी काळात करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. शेतीतून उत्पन्न मिळण्याची शक्यता कमी झाल्याने ▶▶ पान २ वर

### सर्वाधीक दुष्परिणाम शेती क्षेत्रावर

दुष्काळाच्या झळा केवळ शेतकऱ्यांपुरत्या मर्यादित नसून ग्रामीण भागातील शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांच्याही रोजगारावर त्याचा परिणाम होत आहे. शेतीतील कामे कमी झाल्याने या कुटुंबांचा दैनंदिन खर्च भागविणे कठीण होऊ शकते. त्यामुळे रोजगारनिर्मितीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना काम उपलब्ध करून देणे आणि अन्नधान्य वितरणातून त्यांच्या अन्नसुरक्षेला आधार देणे, या उपाययोजनांना महत्त्व दिले जाणार आहे. दुष्काळी उपाययोजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

## देशाला महागाईचा पुन्हा झटका!



**दिल्ली । वृत्तसंस्था**

अनेक कारणांमुळे आधीच अडचणींचा समाना करत असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला आणखी एक फटका बसला आहे. देशात महागाईचा भडका उडाला असून, वाढलेल्या महागाईचा सर्वाधिक चटका देशातील ग्रामीण भागाला सहन करावा लागत असल्याचे ताज्या आकडेवारीवरून दिसते आहे. दुष्काळाच्या झळा सोसत असलेल्या ग्रामीण जनतेचे वाढलेल्या महागाईमुळे कंबरडे मोडल्याचे चित्र आहे.

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाईचा दर सप्टेंबर २०२६ मध्ये वाढून ५.५४ टक्क्यांवर पोहोचला आहे. ऑगस्टमध्ये महागाईचा दर ४.८३ टक्के होता. केंद्रीय सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### आदित्य ठाकरे अमित ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल

मुंबईः शिवाजी पार्क परिसरात रविवारी झालेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनानंतर राजकीय वातावरण तापले आहे. या आंदोलनादरम्यान पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या तरुण आंदोलकांना सोडवण्यासाठी पुढाकार घेतल्याप्रकरणी ठाकरे बंधूंच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. या प्रकरणात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि मनसे नेते अमित ठाकरे यांच्यासह एकूण २५ जणांविरोधात शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांचेही नाव या प्रकरणात असल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेत नेमकी कोणती कृती कायद्याच्या दृष्टीने आक्षेपार्ह ठरवण्यात आली, तसेच संबंधितांवर कोणती कलमं लावण्यात आली आहेत, याबाबत अधिकृत तपशील स्पष्ट झालेला नाही.

### दिल्लीत पोलिसांच्या वेशातील भाडोत्री गुंड-संजय राऊत

मुंबई : राजधानी दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन सुरू केले आहे. पोलिसांनी आंदोलन सुरू होण्यापूर्वीच आंदोलकांची धरपकड सुरू केली. यावेळी काही पुरुष पोलिसांकडून मुली व महिलांना धक्काबुक्की केल्याचा देखील आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केंद्रसरकारवर केला आहे. संजय राऊत यांनी एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओमध्ये एका गाडीत खाकी वर्दी असल्याचे दिसून येत आहे. हा व्हिडिओ शेअर करत राऊत यांनी म्हटले की, ज्या पोलिसांना रस्त्यावर गुंडागर्दी करताना पाहिले, महिला मुलींवर हात टाकताना दिसले, ते भाजपचे (अमित शहा) नकली पोलिस होते. भाडोत्री गुंडांना खाकी गणवेश देऊन आंदोलकांना रोखण्यासाठी उतरवले होते, असा खळबळजनक आरोप राऊत यांनी केला आहे. संजय राऊत म्हणाले, दिल्लीत आंदोलनाच्या आसपास खाकी पोलिस वर्दीने गच्च भरलेल्या गाड्या होत्या, कोणासाठी? नेमप्लेटशिवाय जे पोलिस दिसत होते ते अशी वर्दी घातलेले गुंड होते. हाच राष्ट्रीय सुरक्षेचा गुजरात पॅटर्न आहे.

## विरोधकांचा न्यायसंस्थेला बदनाम करण्याचा प्रयत्न-मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

दिल्लीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या पक्षांच्या शिष्टमंडळाला भेटण्यास भारताच्या सरन्यायाधीशांनी नकार दिल्यानंतर, विरोधक न्यायसंस्थेला बदनाम करण्याचा आणि त्यावरील लोकांचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केला.

मतचोरी थांबवावी आणि मुख्य निवडणूक आयुक्तांनी राजीनामा द्यावा, या मागण्यांसाठी विरोधी पक्षांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयाकडे मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांची भेट घेण्याची विनंती केली होती. मात्र,



मतचोरीच्या आरोपांशी संबंधित प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने सरन्यायाधीशांनी त्यांना भेटण्यास नकार दिला, असे सूत्रांनी सांगितले. नागपुरात पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे मोर्चा काढल्याबद्दल विरोधी नेत्यांवर कडक टीका केली. त्यांनी या कृतीला घटनाबाह्य म्हटले आणि सरन्यायाधीश ▶▶ पान २ वर

# दिल्लीत 'इंडिया' आघाडीचा मोर्चा!

## सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल, आज सुनावणी

### विविध विभागातील २०० अधिकारी संपर्कात-राहुल गांधी

नवी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालय 'इंदिरा भवन' येथे सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत, काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी नरेंद्र मोदी सरकार आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर निशाणा साधत म्हणाले की, अंमलबजावणी संचालनालय, केंद्रीय अन्वेषण विभाग आणि परराष्ट्र मंत्रालय यांसारख्या विभागांमधील सुमारे २०० सरकारी अधिकारी विरोधी पक्षांच्या संपर्कात आहेत. राहुल गांधी यांनी दावा केला की, अंमलबजावणी संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि परराष्ट्र मंत्रालय यांसारख्या विभागांमधील सुमारे २०० सरकारी अधिकारी विरोधी पक्षांच्या संपर्कात आहेत.



**दिल्ली । प्रतिनिधी**

लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. १२) 'इंडिया' आघाडीने कनॉट प्लेस ते सर्वोच्च न्यायालयपर्यंत असा मोर्चा काढला. यानंतर मतदार यादी 'एसआयआर' (विशेष सखोल पुनरावलोकन) प्रक्रियेतील वादाबाबत राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, सौगत रॉय, अखिलेश यादव आणि तेजस्वी यादव यांच्या नावाने सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. 'सुप्रीम कोर्ट बार असोसिएशन'च्या याचिकांसह अशा अनेक याचिकांवर मंगळवारी (दि.१३) सुनावणी होणार आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाकडे नियोजित मोर्चा काढला. मोठ्या संख्येने विरोधी पक्षांचे नेते सर्वोच्च न्यायालयाच्या दिशेने गेले. मोर्चात 'इंडिया' आघाडीतील नेते राहुल गांधी, प्रियांका गांधी, आरजेडी नेते तेजस्वी यादव, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश ▶▶ पान २ वर

## खुणे हल्ला प्रकरणी तीन संशयित ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

**पाली तालुका बीड येथील नागनाथ मंदिर परिसरात अमोल खुणे यांच्यासह काहींवर प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना रविवारी घडली होती. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, बीड ग्रामीण पोलिसांनी तातडीने कारवाई करत काही संशयितांना ताब्यात घेतले आहे.**

या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने कारवाई करत मौजवाडी येथील काही संशयितांना ताब्यात घेतले आहे. घटनेतील इतर आरोपी अद्याप फरार असून, पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत. या हल्ल्यामागील नेमके कारण काय होते, याचा तपास बीड ग्रामीण पोलीस करत आहेत. अमोल खुणे हे नागनाथ मंदिरात दर्शनासाठी गेले असता गेट लावून मारहाण करत जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. अमोल खुणेवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या इशाऱ्यावरूनच हल्ला झाल्याचे म्हटले आहे.

## 'आता संपूर्ण देशच जंतर मंतर बनेल!'

### आंदोलनस्थळाचा दर्जा हटवताच अभिजीत दीपके यांची सरकारवर टीका

**दिल्ली । वृत्तसंस्था**

'कॉकरोच जनता पार्टी'चे नेते अभिजीत दीपके यांनी सोमवारी जंतर मंतरला आंदोलन स्थळाच्या दर्जातून हटवण्याच्या निर्णयावर टीका केली आणि सरकारवर असंतोष व्यक्त करण्याच्या अधिकाराला लक्ष्य केल्याचा आरोप केला. दीपके यांनी सरकारवर हुकूमशाहीचा आरोप केला आणि म्हटले की, आता संपूर्ण देश जंतर मंतर बनेल.



'एक्स'वर पोस्ट करताना दीपके म्हणाले, त्यांनी जंतर मंतरला त्याच्या निश्चित आंदोलन स्थळाच्या दर्जातून हटवले आहे. होय, ते आता आंदोलन स्थळ राहिलेले नाही, कारण एका भ्याड हुकूमशहाने आधीच त्याचे रणांगणात रूपांतर केले आहे. आता संपूर्ण देश जंतर मंतर बनेल. दीपके म्हणाले, हा निर्णय लोकशाही स्वातंत्र्याला मोठा धोका आहे. आज ▶▶ पान २ वर

## काँग्रेसच्या सलग पराभवाला कारण कोण-शिवराज सिंह चौहान

**दिल्ली । वृत्तसंस्था**

मत चोरी, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरुन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्याला भाजपकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे. एकापाठोपाठ एक निवडणुका हारणे आणि त्या पराभवाची खदखद रस्त्यावर आंदोलन करून व्यक्त करणे ही काँग्रेसची वृत्ती बनली आहे, अशी टीका केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली. काँग्रेसच्या सलग पराभवाचे कारण निवडणूक आयोग नाही तर ते स्वतःच आहेत, असा दावाही त्यांनी केला. दि. १२ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषदेत त्यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. 'इंडिया' आघाडीच्या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना चौहान यांनी असा दावा केला की, त्यांना ▶▶ पान २ वर

## मतदार यादीतील नाव नोंदणीस आणखी मुदतवाढ



● एसआयआर प्रक्रियेत नाव वगळलेल्यांना संधी, निवडणूक आयोगाचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात आणि देशाची राजधानी दिल्लीतही सध्या मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध जोरदार आंदोलन सुरू आहे. एसआयआर प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करत, तसेच ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू आहे. त्यातच, येत्या १६ नोव्हेंबर रोजी संपुष्टात येत असलेल्या मतदार यादी विशेष पुनरीक्षक कार्यक्रमास मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्रात १ ऑक्टोबर ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०९ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३५.०० क्विंटल | २,७०१ | ३,४०० | ३,०४३ |
| ज्वारी/हायब्रिड: ११७.०० क्विंटल | ३,७०१ | ५,९०० | ४,८२२ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : १.०० क्विंटल | १०,००० | १०,००० | १०,००० |
| उडीद : १०.५० क्विंटल | ९,३०१ | ९,७२५ | ९,५०५ |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,६०० | २,८७२ | २,७७७ |
| मुग: ०.५० क्विंटल | ९,७०० | ९,७०० | ९,७०० |
| सोयाबीन: ११७.५० क्विंटल | ५,७५१ | ७,००० | ६,६१७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,७१० | ६,७१० | ६,७१० |

# गणनेतील सत्यता की भविष्याची दिशा?

## २०२७ च्या जात जनगणनेतील 'स्वयं-घोषणे'वर सर्वोच्च न्यायालयाचा बडगा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**भारतात आगामी २०२७ च्या जनगणनेत समाविष्ट केल्या जाणाऱ्या जातनिहाय माहितीच्या स्वयं-घोषणेबाबत व्यक्त करण्यात आलेल्या गंभीर चिंतांची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. जनगणनेदरम्यान नोंदवल्या जाणाऱ्या जातीच्या माहितीची कोणतीही कायदेशीर किंवा अधिकृत पडताळणी होणार नसेल, तर त्या डेटावर आधारित कल्याणकारी योजना आणि धोरणांचे भवितव्य धोक्यात येऊ शकते, असा इशारा देत न्यायालयाने केंद्र सरकारकडून स्पष्टीकरण मागितले आहे.**

भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जोयमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या त्रिस्तरीय खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी पार पडली. खंडपीठाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना या संदर्भातील 'स्टँडिंग ऑपरेटिंग प्रोसिजर' म्हणजेच जनगणनेची प्रत्यक्ष कार्यपद्धती न्यायालयासमोर मांडण्याचे निर्देश




दिले आहेत.याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद: 'पडताळणीविना डेटा म्हणजेसामाजिक धोका' ही जनहित याचिका आकाश गोयल यांनी दाखल केली असून, त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील मुक्ता गुप्ता यांनी न्यायालयात बाजू मांडली पडताळणीचा अभाव: केवळ एका फॉर्म किंवा प्रश्नावलीच्या आधारे कोणतीही खातरजमा किंवा सरकारी प्रमाणपत्राची पडताळणी न करता ▶▶ पान २ वर

### नैतिक आणि सामाजिक दृष्टिकोन: प्रत्येक भारतीयाची चिंता

जात जनगणना ही केवळ आकडेवारी नसून ती देशातील प्रत्येक नागरिकाच्या सामाजिक आणि आर्थिक हक्कांशी जोडलेली बाब आहे. चुकीच्या आकडेवारीमुळे खऱ्या गरजूंना त्यांच्या हक्कांच्या लाभांपासून वंचित राहावे लागू शकते, तर दुसरीकडे अयोग्य घटक त्याचा लाभ घेऊ शकतात. त्यामुळे ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक, अचूक आणि नैतिकदृष्ट्या सक्षम असणे हे संपूर्ण राष्ट्राच्या हिताचे आहे. तुम्हाला २०२७ च्या जात जनगणनेतील स्वयं-घोषणेबाबत पडताळणी यंत्रणा लागू करणे कितपत व्यावहारिक आणि गरजेचे वाटते?

cmyk

## अग्रलेख

# विवेक भीमनवार यांची 'रजा' की तात्पुरती मलमपट्टी?

## एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाची राजकीय आणि नैतिक चिकित्सा

महाराष्ट्राच्या लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा आणि त्याभोवती गुंफलेले भ्रष्टाचाराचे जाळे हा नेहमीच राज्यातील ज्वलंत आणि संवेदनशील विषय राहिला आहे. अलीकडेच समोर आलेल्या कथित पेपरफुटी प्रकरणाने पुन्हा एकदा लाखो होतकरू विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळला जात असल्याचा गंभीर प्रश्न निर्माण केला आहे. या संपूर्ण वादळाच्या केंद्रस्थानी असलेले चझडउ चे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी राजीनामा देण्याऐवजी 'स्वतःहून रजेवर जाण्याचा' मार्ग पत्करला. हा निर्णय जाहीर झाल्यानंतर राजकीय वर्तुळात आणि विद्यार्थी वर्गात चर्चांना उधाण आले आहे. हा निर्णय नैतिकतेचे प्रतीक आहे की देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारची एखादी तात्पुरती मलमपट्टी किंवा प्रकरण थंड करण्याची रणनीती, याचा घेतलेला हा आढावा.

विद्यार्थ्यांचा तीव्र रोष आणि पुणे येथील सलग ११-१२ दिवसांपासून सुरू असलेले आंदोलन पाहता, अध्यक्षपदावरून भीमनवार यांची हकालपट्टी किंवा त्यांचा राजीनामा हीच विद्यार्थ्यांची प्राथमिक आणि एकमेव मागणी होती. अशा स्थितीत त्यांनी राजीनामा न देता रजेवर जाणे ही एक संभ्रम निर्माण करणारी कृती ठरली आहे. कायदेशीर आणि घटनात्मक स्थिती: चझडउ अध्यक्षांना त्यांच्या पदावरून हटवण्याची किंवा राजीनामा घेण्याची एक विशिष्ट घटनात्मक प्रक्रिया असते. थेट दबावामुळे किंवा आंदोलनामुळे संवैधानिक पदावरील व्यक्तीने राजीनामा देणे भविष्यात इतर स्वायत्त संस्थांच्या स्वातंत्र्यासाठी चुकीचा पायंडा पाडू शकते, असा युक्तिवाद सरकार आणि प्रशासकीय वर्तुळातून केला जाऊ शकतो. भीमनवार यांनी स्वतः म्हटले आहे की, त्यांनी आयुष्यात नैतिकतेला प्राधान्य दिले आहे. जर नैतिक जबाबदारीच स्वीकारायची होती, तर चौकशी पूर्ण होईपर्यंत पूर्णपणे पदमुक्त होणे अधिक पारदर्शक ठरले असते. 'रजा' संपल्यानंतर ते पुन्हा त्याच पदावर रुजू होऊ शकतात, ज्यामुळे या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण होते की ही केवळ तात्पुरती मलमपट्टी आहे का? महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या देवेंद्र फडणवीस यांच्या हातामध्ये गृह आणि महत्त्वाच्या प्रशासकीय खात्यांची सूत्रे आहेत. अशा संवेदनशील प्रकरणात सरकारची भूमिका अत्यंत सावध असणे अपेक्षित असते. आंदोलनाची धग कमी करणे: पुण्यात आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत आणि हजारो विद्यार्थ्यांच्या सहभागाने सुरू असलेले आंदोलन निवडणुकीच्या किंवा प्रशासकीय स्थैर्याच्या दृष्टीने सरकारसाठी डोकेदुखी ठरत होते. विद्यार्थ्यांचा आक्रोश शांत करण्यासाठी तात्काळ काहीतरी ठोस कृती करणे आवश्यक होते. भीमनवार यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याऐवजी त्यांना 'स्वतःहून रजेवर जाण्यास सांगणे' हा सरकारचा एक सुवर्णमध्य असू शकतो, जेणेकरून सरकारवर थेट प्रशासकीय हस्तक्षेपाचा ठपका बसणार नाही आणि आंदोलनही काही प्रमाणात माघार घेईल. माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली उच्चस्तरीय समिती निष्पक्षपणे काम करू शकेल, हा संदेश देण्यासाठी अध्यक्षांचे पदापासून दूर राहणे आवश्यक होते. परंतु, राजीनामा न घेता केवळ रजा मंजूर करणे म्हणजे चौकशीच्या निष्कर्षांवर प्रभाव टाकण्याची मोकळीक अद्यापही व्यवस्था राखून ठेवते का, असा संशय विरोधक व्यक्त करत आहेत. महाराष्ट्रातील एमपीएससी विद्यार्थी हा अत्यंत संघर्षशील वर्ग आहे. वयोमर्यादेचे प्रश्न, परीक्षा वेळेवर न होणे आणि त्यात भर म्हणून पेपरफुटीसारखे प्रकार यामुळे विद्यार्थ्यांच्या पिढ्यांच्या पिढ्या उद्ध्वस्त होत आहेत. आंदोलक विद्यार्थ्यांचे म्हणणे होते की, जोपर्यंत सर्वोच्च पदावर व्यक्ती कायम आहे, तोपर्यंत पुराव्यांशी किंवा तपासाशी तडजोड केली जाऊ शकते. भीमनवार यांची रजा म्हणजे समस्येचे मूळ उपटून टाकणे नसून, केवळ आग विझवण्यासाठी मारलेला पाण्याचा फवारा आहे, अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये आहे. जर चौकशीत क्लीन चिट मिळाली, तर ते पुन्हा त्याच पदावर परततील आणि जर दोषी आढळले तरच कारवाई होईल, अशी ही अनिश्चितता विद्यार्थ्यांच्या मनात असंतोष निर्माण करणारी आहे. विवेक भीमनवार यांचे रजेवर जाणे ही तात्काळ पेटलेला वणवा शांत करण्यासाठी वापरलेली तात्पुरती रणनीती वाटल्यास नवल वाटू नये. हे पाऊल पारदर्शकतेच्या दिशेने एक लहानसे आंशिक पाऊल असू शकते, परंतु ते पूर्ण न्याय देऊ शकत नाही. जोपर्यंत पेपरफुटीमागील मुख्य सूत्रधार तुरुंगात जात नाहीत आणि एमपीएससीच्या यंत्रणेत आमूलाग्र आणि कडक पारदर्शक सुधारणा होत नाहीत, तोपर्यंत अशा तात्पुरत्या रजा किंवा समित्या म्हणजे केवळ धुमशान थांबवण्याचा एक उपचार ठरेल. विद्यार्थ्यांच्या विश्वासाला पुन्हा उभारी देण्यासाठी केवळ सदिच्छा नाही, तर कठोर कायदेशीर कारवाईची गरज आहे.

# सत्यशोध घटस्थापना

## घटस्थापनेच्या कृषी (शेती) तांत्रीकी विश्वाचा उलगडा

**घटस्थापना हा निर्ऋतीपुत्री दुर्गेच्या( नैर्ऋती) नावाने साजरा केल्या जाणाऱ्या कृषीमायेच्या नवरात्री उत्सवाचा पहिला दिवस. नवरात्री उत्सवाची सुरुवात ही घटस्थापनेच्या विधीने होते. येथे प्रश्न आहे ब्राम्हणी छावणीने नेणीवेत ढकललेल्या अब्राह्मणी इतिहासादींचा त्यांच्या सण, उत्सवांचा उलगडा करण्याचा. त्यांचा उलगडा करायला आर्केयोलाँजी फारशी मदत करू शकत नाही आणि उत्खानित वस्तू फारश्या बोलू शकत नाहीत येथे वैदिकि श्रुतीशिवाय दुसरा स्त्रोत उपलब्ध नाही. वैदिकी श्रुतीने तांत्रिकी श्रुतीला आणि तिच्या गंधर्वांदी इतिहासकारांना नेणीवेत ढकललेले असले तरी वैदीकि श्रुती ही तांत्रिकी श्रुतीच्या उसनवारीवरच उभी आहे.**

बेडेकर त्यांच्या ' दिव्येतिहासाचे स्वरूप आणि वारसा ' या आपल्या शोधनिबंधात म्हणतात ज्यांना आपण पुराणातल्या देव, ऋषी , दानव इत्यादींच्या कथा म्हणतो त्यांना इंग्रजीत मिथ असे म्हणतात. या कथांच्या अभ्यासाची ' मायथोलोजी ' नावाची ज्ञानशाखा बरीच प्रगल्भ झाली आहे . मिथ म्हणजे अतिमानुषी पद्धतीने सांगितलेला इतिहास असे प्रतिबिंबवादी अन्वेषणपद्धत सुध्दा सांगते. जॉर्ज फ्रेझर त्याच्या ' गोल्डन बो ' म्हणतो की विविध प्रकारच्या संस्कृतीमध्ये विविध काळात प्रचलित लोककथांमध्ये आढळणारी वैश्विक प्रतीके म्हणजे आदिबंध होय. त्यापुढे जावून युंग म्हणतो की आदीबंध हे मानसपूर्व समाजव्यवस्थेचे आत्मनिरीक्षणात्मक मान्यताप्राप्त स्वरूप होय. घटस्थापनेच्या संदर्भात असा कुठला मानसपूर्व आत्मनिरिक्षणात्मक मान्यताप्राप्त अदिबंध आहे? काय आहेत घटस्थापनेमागचे सामूहिक अदिबंध?..... यासाठी आपल्याला भारतीय इतिहासाकडे वळावे लागेल त्याच्या उगमापर्यंत जावे लागेल. भारतीय इतिहासाची सुरुवात शोधायची असेल तर आपल्याला हारित नावाच्या स्त्रीसत्तेचे कायदे ग्रंथीत करणाऱ्या सुप्रसिद्ध धर्मसुत्रकाराच्या एका सुत्राकडे लक्ष वेधले पाहिजे, ते सुत्र त्याच्यांच शब्दात पुढीलप्रमाणे : ' श्रुतीश्? च द्विविधा , वैदिकी तान्त्रिकी च! ' श्रुती ह्या दोन आहेत एक वैदिकी अन्? दुसरी तांत्रिकी भारतीय इतिहासाची सुरुवात ही वैदिकिने नव्हे तर तांत्रिकिने होते. हे काध्यावरून? तंत्र या शब्दाचा उल्लेख वेदात फक्त एकदाच येतो ज्याचा अर्थ होतो शेती. याकडे देवीप्रसाद चटोपाध्याय त्यांच्या लोकायतमध्ये लक्ष वेधतात. आपल्याला जर विचारले की तंत्र आधी की ज्ञान तर निश्चितच अगोदर तंत्र येतं आणि नंतर ज्ञान. कारण एखादा शोध , तंत्र खूप साऱ्या प्रयोगाने हाती लागल्यानंतर त्याचे ज्ञान अस्तित्वात येते. तंत्राचा मूळ अर्थ शेती होतं असल्याचा उल्लेख ऋग्वेदात येतो. तर वेदचा मूळ अर्थ होतो ज्ञान हे ज्ञान कशाचे तर कृषिमायेचे, यज्ञाचे. म्हणून




तांत्रिकी श्रुती अगोदरची आणि वैदकी श्रुती ही नंतरची. भारतीय इतिहासाची सुरुवात ही शेतीच्या तांत्रिकी श्रुतीने होते हे यावरून स्पष्ट होते. भारतातच नव्हे तर सबंध जगातील शेतीचा शोध हा निःसंदिग्धपणे स्त्रियांनी लावला असल्याचे बिफ्रा त्याच्या ' द मदर्स ' खंडात सिद्ध करतो..... जे समाज भौतिक अस्तित्वातुन लयाला जातात त्यातील काही अवशेष त्या समाजातील नष्ट झालेली वास्तवता ही विधी जतन करत असतो . मानवी मेंदू जरी शरीराबरोबर जन्माला येत असला तरी तो पूर्वमानवसमाजाच्या विकासाचेही अपत्य असतो. त्यामुळे तो अश्या वास्तवता त्यांचे अवशेष ज्या एक विधी म्हणून जतन करतो. घटस्थापनेची अशी कुठली भौतिक वास्तवता होती जी आज एक धार्मिक विधी म्हणून जतन केली जात आहे? शेतीचा उदय नदीखोऱ्याखालोखाल कोरड्या केलेल्या तलावांच्या तळांमध्ये व सोयीस्कर तलावांच्या सभोवतालच्या जमिनीमध्ये झाला हा शोध भारतात निर्ऋती आधी जंगलातील तलावाच्या अस्थिर वाडग्याच्या शेतीच्या स्वरूपात लावते. आणि नंतर नदीच्या खोऱ्यात आपला गण घेवून उतरते व नदीवक्त्र शेती करून सुस्थिर असे स्त्रीराज्य स्थापते. तोपर्यंत तिची जमात अनेक उत्पादन प्रकारांतून जाते. त्यात अन्नचयन-मृगया-पशूपालन इत्यादी... निर्ऋती तिचा गण घेवून सुरुवातीला सिंधू नदीच्या खोऱ्यात उतरुन हस्तश्रमाच्या शेतीचा शोध लावून ऋती गणाचे वैराज्य स्थापले. म्हणून त्यास सिंधूवक्त्र शेती म्हणतात. नवरात्राची सुरुवात ही घटस्थापनेच्या विधीने होते. जगभर आणि भारतातसुद्धा मातृदेवतांची पुजा ही पूर्ण घटाच्या रूपातच केली जाते. नवरात्रीची पूजा ही पूर्ण घटाच्या रुपात, गुजरातमधील गौरी पूजन हे पूर्ण घटाच्या रुपात, बंगालची कालीपुजा ही पूर्ण घटाच्या रुपातच साजरी केली जाते. घटपुजा म्हणजे सिंधूवक्त्र शेतीचा धार्मिक व वैधिक अवशेष असल्याचे देवीप्रसाद चटोपाध्याय त्यांच्या लोकायत मध्ये सिद्ध करतात. कुंभ ( घट) हा जसा गर्भाशयाचा द्योतक आहे तसाच तो मातृदेवतेचा सुद्धा. घटस्थापना हा मुळात स्त्रीसत्तेचा , नवनिर्मितीचा , गण आणि शेतीच्या नवसर्जनाचा उत्सव वा विधी आहे. या घटस्थापनेच्या विधीत स्त्रिया ह्या जमीन सारवून घेवून शेतातून आणलेली गाळाची माती त्या सारवलेल्या जागेवर पसरवून त्यात कडधान्ये मिसळतात . सुरुवातीला त्यात साळ मिसळली जात असावी मात्र नंतर त्याची जागा गव्हाने घेतली असावी कारण हालच्या गाथासप्तशतीत गव्हाचा उल्लेख आढळत नाही. कर्नाटक मध्ये साजऱ्या केल्या जाणाऱ्या गौरी पूजनाच्या विधीत साळ फोकली जाते. शेतीचा शोध जंगली भाताच्या शोधाने लावलेला असल्याने त्यात भात पिकाचा आवर्जून समावेश असावा. ह्या कडधान्ये मिसळलेल्या मातीवर बोळके( घट) ठेवून या बोळक्यातून पाणी पाजरून या कडधान्यांस नऊ दिवस दिले जाते. जगभर आणि भारतातसुद्धा मातृदेवतांची पुजा ही पूर्ण घटाच्या रूपातच केली जाते. नवरात्रीची पूजा ही पूर्ण घटाच्या रुपात, गुजरातमधील गौरी पूजन हे पूर्ण घटाच्या रुपात, बंगालची कालीपुजा ही पूर्ण घटाच्या रुपातच साजरी केली जाते. घटपुजा म्हणजे सिंधूवक्त्र शेतीचा धार्मिक व वैधिक अवशेष असल्याचे देवीप्रसाद चटोपाध्याय त्यांच्या लोकायत मध्ये सिद्ध करतात. एक मातीची पणती नऊ दिवस तेवत ठेवली जाते. नऊ दिवस स्त्रिया व्रत पाळतात. या कडधान्याचे कोंब निघालेली माती त्यासहित गोळा करून जवळच्या विहीर, तलाव, नदीत टाकतात. हा जो घटस्थापनेचा विधी आहे तो जशीच्या तशी प्राचीन सिंधूक्त्र शेतीची वास्तवता जतन ठेवतो. याच विधीच्या माध्यमातून अस्थिर शेती करत असलेला मानवसमाज हा नदीच्या खोऱ्यात स्थिर शेती करू लागला. देवीप्रसाद चटोपाध्याय त्यांच्या लोकायत मध्ये म्हणतात की घटस्थापना हा सिंधूवक्त्र शेतीचाच विधी आहे. कुठल्याही धर्मातील विधी हे गतकाळातील भौतिक वास्तवतेतून लयाला गेलेल्या वास्तवतेचे कर्मकांड असतात. या विधींना अत्यंत टोकाचा नकार देण्यातुन काहीही साध्य होत नाही. माणूस ज्याप्रमाणे जाणिवेने नकळत करतो तसाच समाजही जाणीवेप्रमाणे नकळतपणे नेणीवेने कृती करत असतो. घटस्थापना ही गतकाळातील मानव समाजाची नेणीव आहे. तेव्हा या नेणिवेची विधी असलेल्या घटस्थापना विधींची मिथकिय उकल जाणीवनेणीवयुक्त प्रमाणशास्त्राच्या अब्राह्मणी पद्धतीने करून तिचे विधायक नकार करण केले पाहिजे! त्यातून समाज दूर न जाता जवळ येऊन अधिक प्रबोधित होईल. घटस्थापना ह्या अब्राह्मणी कृषी तांत्रिक विधीच्या सर्व भारतीयांना शुभेच्छा.

**भाई आकाश निर्मळ**
**मो.९४२२५३६९००**

## पान १ वरून...

### देशाला महागाईचा

सोमवारी जाहीर केलेल्या तात्पुरत्या आकडेवारीतून हे वास्तव समोर आले आहे. भाजीपाल्यासह अन्नधान्याच्या किमतींमध्ये झालेली वाढ हे महागाई वाढीचे प्रमुख कारण आहे. ऑगस्टमध्ये ५.९७ टक्के असलेला अन्नधान्य महागाईचा दर सप्टेंबरमध्ये ७.७४ टक्क्यांवर गेला. कांदा, आले आणि लसूण यासारख्या रोजच्या वापरातील वस्तूंच्या किमती वाढल्याने ग्राहकांच्या खिशावरील भार वाढला आहे. कांद्याच्या किमतींमध्ये विशेष वाढ नोंदवण्यात आली. सप्टेंबरमध्ये कांद्याच्या किमतीतील वार्षिक महागाई १०८.०९ टक्क्यांवर पोहोचली, तर ऑगस्टमध्ये ती ४८.७८ टक्के होती. आल्याच्या किमतीतील महागाई ६२.८५ टक्के आणि लसणाची ५४.६२ टक्के नोंदवण्यात आली. दुसरीकडे, बटाट्याच्या किमती वर्षभरापूर्वीच्या तुलनेत ११.५० टक्के, तर टोमॅटोच्या किमती ८.६२ टक्के कमी होत्या. ग्रामीण भागातील किरकोळ महागाई ६.०८ टक्क्यांवर, तर शहरी भागातील महागाई ४.८८ टक्क्यांवर पोहोचली. दरम्यान, रिझर्व्ह बँकेने मागील आठवड्यात रेपो दरात ०.२५ टक्क्यांची वाढ करून तो ५.५० टक्क्यांवर नेला होता.

-------------

### राज्यावर दुष्काळाचे

शेतकऱ्यांसोबतच शेतमजुरीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांनाही आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे यावर शासनाचा भर राहणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. राज्यातील दुष्काळाची तीव्रता गंभीर असून, अनेक भागांतील पाण्याचे स्रोत आटू लागले आहेत. यामुळे पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही बिकट होण्याची शक्यता आहे. केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकातील अधिकाऱ्यांनीही बैठकीत या परिस्थितीची गंभीरता मांडली. राज्यातील परिस्थितीची केंद्र सरकारला कल्पना असून, दुष्काळ निवारणासाठी केंद्राच्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही पथकाने राज्य सरकारला दिली. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी राज्य सरकारकडून उपलब्ध जलसाठ्यांचे नियोजन केले जात आहे. अनेक गावांमध्ये पाण्याचे स्रोत आटल्याने आगामी काळात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ येऊ शकते. ऑगस्ट २०२७ पर्यंत उपलब्ध पाण्याचे पहिले आरक्षण पिण्यासाठी करण्यात आले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दुष्काळाचा सामना करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून जलसाठ्यांमधील गाळ काढणे, जलस्रोतांची दुरुस्ती आणि त्यांचे पुनरुज्जीवन यांसारखी कामे हाती घेण्यात येणार आहेत. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याचा अधिक परिणामकारक वापर करण्यासोबतच भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पशुधनाच्या संरक्षणासाठी चारा उपलब्धतेचे स्वतंत्र नियोजन करण्यात येत आहे. राज्यात उपलब्ध चारा सध्याच्या अंदाजानुसार २० ते १२० दिवस पुरेल, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे चारा टंचाई निर्माण होण्यापूर्वीच आवश्यक उपाययोजना करण्यावर शासनाचा भर आहे. ज्या पाणलोट क्षेत्रांमध्ये जमिनीत पुरेसा ओलावा आहे, अशा भागांत चारा उत्पादन वाढविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच शासनाने निश्चित केलेल्या दराने चारा खरेदी करून त्याची साठवणूक केली जाईल. गरज भासल्यास चांगला पाऊस झालेल्या अन्य राज्यांतूनही चारा उपलब्ध करून घेण्याचा विचार करण्यात येणार आहे. दरम्यान, केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाने अहिल्यानगर, सोलापूर, जालना, बीड, धाराशिव आणि यवतमाळसह राज्यातील विविध जिल्ह्यांना भेटी देऊन परिस्थितीची पाहणी केली. या दौऱ्यात पीकस्थिती, पाणीसाठे, चारा उपलब्धता आणि दुष्काळी उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.

-------------

### दिल्लीत 'इंडिया' आघाडीचा

यादव, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आणि इतरांचा समावेश होता. यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात निदर्शने केली. निवडणूक आयोगाच्या कामकाजाचा निषेध करण्यासाठी काँग्रेस खासदाराने कनॉट प्लेस ते सर्वोच्च न्यायालय अशा 'चलो दिल्ली' (दिल्लीकडे कूच) आंदोलनाची हाक दिली होती. या मुद्द्यावर विरोधी पक्षाच्या खासदारांना भेटण्यासाठी भारताच्या सरन्यायाधीशांची संमती मिळाली नसतानाही विरोधी पक्षांनी हे आंदोलन पुढे चालू ठेवले. मोर्चापूर्वी राहुल गांधींनी या आंदोलनाबाबत पत्रकार परिषद घेतली. 'एक्स' (द) वरील एका पोस्टमध्ये त्यांनी म्हटले: लोकशाहीसाठी मोर्चा. न्यायासाठी मोर्चा. चलो दिल्ली. दरम्यान, सरन्यायाधीशांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांना भेटण्यास नकार दिला होता. सोमवारी न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी नमूद केले की, प्रत्येक भारतीय नागरिकाला न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे आणि सर्वोच्च न्यायालयाची दारे सर्वांसाठी खुली आहेत.'इंडिया' आघाडीच्या भेटीच्या विनंतीला प्रतिसाद देताना सरन्यायाधीशांनी सांगितले की, त्यांना रविवारी एक पत्र मिळाले होते. त्यांनी त्याच रात्री त्याला उत्तर दिले होते; त्यात शिष्टमंडळाला भेटणे का शक्य होणार नाही, याचे कारण स्पष्ट केले होते. सर्वोच्च न्यायालयाची दारे सर्वांसाठी खुली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते.

-------------

### विरोधकांचा न्यायसंस्थेला बदनाम

सूर्यकांत यांनी भेट नाकारल्यावर विरोधकांनी अपमानास्पद भाषेचा वापर केल्याचा आरोप केला. त्यांना भारतातील संस्थांना, विशेषतः न्यायसंस्थेला बदनाम करायचे आहे आणि त्यावरील लोकांचा विश्वास कमी करण्याचा कट ते रचत आहेत. जर तुमची काही तक्रार असेल, तर न्यायालयात जा आणि तिथे लढा. मी वारंवार हेच सांगत आलो आहे की, त्यांचा संविधानावर विश्वास नाही. ते घटनाबाह्य प्रवृत्तीचे आहेत आणि मोर्चा काढून त्यांनी हे सिद्ध केले आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. मोर्चा घेऊन आलेल्यांना भेटणे शक्य नाही, असे सांगून सरन्यायाधीशांनी आपली घटनात्मक कर्तव्ये पार पाडताना कायद्यानुसारच वर्तन केले, असे त्यांनी नमूद केले. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाची भूमिका योग्य असल्याचे सांगत, आंदोलन करणाऱ्या राजकीय शिष्टमंडळाला सरन्यायाधीशांनी भेटावे, अशी अपेक्षा विरोधक कशी करू शकतात? असे फडणवीस म्हणाले.

----------

### काँग्रेसच्या सलग पराभवाला

पराभव स्वीकारता आलेला नाही. यामुळे ते घटनात्मक संस्थांना लक्ष्य करत आहेत. एकामागून एक निवडणुकांमधील पराभव आणि त्याची खदखद रस्त्यावर उतरून आंदोलनांच्या माध्यमातून व्यक्त करणे, हीच काँग्रेसची वृत्ती बनली आहे,'' अशी टीका त्यांनी केली.

---------

### 'आता संपूर्ण देशच

मोदींनी जंतर मंतरला आंदोलनासाठी निश्चित केलेल्या जागेच्या अधिसूचनेतून वगळले. उद्या ते लोकशाहीलाच अधिसूचित करतील. ते पुढे म्हणाले की, हुकूमशहाची समस्या कधीच आंदोलनाची जागा नव्हती. समस्या होती लोकांची आंदोलन करण्याची कल्पना. दरम्यान, सीजेपी नेते सौरव दास यांनी एका पोस्टमध्ये लिहिले, नरेंद्र मोदी जंतर मंतरला का घाबरतात? जंतर मंतर भारताच्या लोकांचे आहे. हा निर्णय घेण्यापूर्वी गृह मंत्रालयाने नागरिक, संघटना किंवा इतर हितधारकांशी सल्लामसलत केली होती का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या निर्णयाला मनमानी संबोधत दास म्हणाले की, यामुळे आंदोलन करण्याच्या मूलभूत अधिकाराला धोका निर्माण होतो. त्यांनी लिहिले, ज्याप्रमाणे पंतप्रधान जनतेच्या जंतर मंतरला अधिसूचित स्थळांच्या यादीतून वगळत आहेत, त्याचप्रमाणे ते लवकरच भारतातील लोकशाहीलाही अधिसूचित करतील. ते पुढे म्हणाले, आता संपूर्ण देशच जंतर मंतर बनत आहे. या नव्या व्यवस्थेवर टीका करताना आशुतोष रांका यांनी विचारले, माउंट एव्हरेस्टला आंदोलनासाठी निश्चित स्थळ म्हणून का घोषित करू नये.?

------------

### मतदार यादीतील नाव नोंदणीस

२०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीसाठी दावे व हरकती सादर करण्याच्या मुदतीत भारत निवडणूक आयोगाने पुन्हा वाढ केली आहे. त्यानुसार, आता नागरिकांना २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. अंतिम मतदार यादी मात्र पूर्वीच्या वेळापत्रकानुसार १६ नोव्हेंबर २०२६ रोजी म्हणजेच दिवाळीनंतर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार, दावे व हरकती सादर करण्याचा कालावधी ३१ ऑगस्ट ते २६ ऑक्टोबर २०२६ असा राहील. तसेच नोटीस टप्पा आणि दावे व हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया ३१ ऑगस्ट ते १० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर १६ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, नोंदींमध्ये दुरुस्ती करणे तसेच आवश्यकतेनुसार हरकती दाखल करण्यासाठी ही मुदतवाढ महत्त्वाची आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी तसेच नवमतदारांनी या वाढीव मुदतीचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने केले आहे. दरम्यान, आजही मतदार यादीतून नाव वगळण्यात आल्याच्या अनेक तक्रारी आहेत. त्यासोबतच, मतदार यादीत नाव येण्यासाठी संबंधित मतदार प्रयत्नशील असून आपल्या बीएलओंकडे जाऊन पडताळणी करत आहेत. त्यामुळे, निवडणूक आयोगाचा हा निर्णय त्यांना दिलासा देणारा आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील एसआयआर प्रक्रिया दरम्यान करण्यात आलेल्या मतदार वगळणीविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दोन रिट याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. 'द इंडियन एक्सप्रेस'च्या अहवालात दोन निवडणूक आयुक्तांनी एसआयआर प्रक्रियेतील काही निर्णयांवर आक्षेप नोंदवल्याचे उघडकीस आल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयात या याचिका दाखल झाल्या आहेत. निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक आयुक्तांनी घेतलेले निर्णय हे सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निकालांच्या आणि जनहिताच्या विरोधात असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

-------------

### गणनेतील सत्यता की

लोकांची जात नोंदवली जात आहे. गलत माहितीचा धोका: कोणत्याही पडताळणी यंत्रणेशिवाय स्वयं-घोषणेवर विसंबून राहिल्याने खोट्या किंवा चुकीच्या माहितीची नोंद होण्याची मोठी शक्यता आहे. डेटाची विश्वसनीयता: जनगणनेच्या माहितीवर देशातील बहुतांश सामाजिक कल्याणकारी योजना, बजेटचे वाटप आणि धोरणात्मक निर्णय अवलंबून असतात. त्यामुळे एका लहानशा चुकीचा संपूर्ण राष्ट्रीय डेटावर अत्यंत विपरीत परिणाम होऊ शकतो.याचिकेतील प्रमुख मागण्या पारदर्शक यंत्रणा: जोपर्यंत सरकारी जात प्रमाणपत्रांची सत्यता तपासण्यासाठी एक पारदर्शक आणि पडताळणीयोग्य यंत्रणा लागू केली जात नाही, तोपर्यंत ही प्रक्रिया थांबवावी डेटा वापरास मर्यादा: पडताळणी न केलेल्या या जनगणनेच्या डेटाचा वापर भविष्यात आरक्षणाचे धोरण ठरवण्यासाठी किंवा कल्याणकारी योजनांच्या वाटपासाठी केला जाऊ नये.

-------------

# वडिलांचा खून केल्याच्या आरोपातून मुलाची निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**

**मौजे महिंदा ता. आष्टी जि. बीड येथील मयत दत्तू सुखदेव आव्हाड यांचा खून केल्याच्या आरोपातून मयताचा मुलगा संतोष दत्तू आव्हाड याची आज प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, बीड यांनी सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आहे.**

या प्रकरणाबाबत थोडक्यात हकीकत अशी की ,अंमळनेर पोलीस ठाण्यात गु.र.नं .५३/२५ नुसार कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता अन्वये फिर्यादी बळीराम गीते यांनी आरोपी संतोष दत्तू आव्हाड याचे विरुद्ध त्याने त्याच्या वडिलांचा खून केल्याचा आरोप करून सदरचा गुन्हा नोंद केला होता, त्यानुसार आरोपीस अंमळनेर पोलिसांनी अटक करून पुरेशी पोलीस कस्टडी मिळवली व त्यानंतर आरोपीस मा .न्यायालयाने न्यायालयीन कोठडीत पाठवले, दरम्यानच्या काळात तपास चालू असताना तसेच तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीतर्फे तीन वेळा त्याचा जामीन अर्ज सत्र न्यायालयात दाखल केला होता मात्र न्यायालयाने आरोपी संतोष यास जामीनावर सोडण्यास नकार दिला, व सदरचा खटला आरोपीस जिल्हा कारागृहात ठेवूनच चालवावा असा आदेश केला, त्या अनुषंगाने सदरचा खुनाचा खटला मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे चालविण्यात आला, या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले, त्यामध्ये मयताचा जावई बळीराम गीते यास फिर्यादी म्हणून तपासले तसेच मयताची पत्नी व मयताच्या चार मुली, मयताचा पुतण्या आणि घटनास्थळ पंच व हत्यार जप्ती पंचनाम्यावरील पंच तपासण्यात आले, त्याचबरोबर सीसीटीव्ही फुटेज मधील तज्ञ व एक धाबा चालक व एक स्वतंत्र साक्षीदार आणि वैद्यकीय अधिकारी आणि दोन पोलीसतपासी अंमलदारांसह एकूण १३ जणांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या, मात्र तपासातील त्रुटी तसेच रासायनिक विश्लेषणाचे अहवाल आणि साक्षीदारांच्या जाबजबाबात मतभिन्नता दिसून आल्याने व आरोपीतर्फे बीड येथील ज्येष्ठ विधीज्ञ ड. अनिल बारगजे यांचा उलटतपास व युक्तिवाद तसेच दाखले याचे जोरावर व अंतिम युक्तीवादानंतर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, बीड यांनी आज सबळ पुराव्या अभावी आरोपी संतोष दत्तू आव्हाड याची निर्दोष मुक्तता केली. या खटल्याकडे महिंदा ता. आष्टी जि. बीड सह आजूबाजूच्या गावातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते, या खटल्यामध्ये आरोपी संतोष च्या वतीने बीड येथील ज्येष्ठ वकील अनिल बारगजे, किशोर खेडकर यांनी प्रभावी काम केले, व आरोपीची निर्दोष मुक्तता करणे कामी मोठी कामगिरी निभावली, त्यांना ॲड. विलास ढाकणे, सुनील आंधळे, दत्ता शिंदे आदी वकिलांनी सहकार्य केले, या निकालामुळे ॲड.बारगजे व किशोर खेडकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. १३ ऑक्टोबर २०२६



## थोडक्यात

### ज्येष्ठ अभिनेत्री मधु कांबीकर यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील कांबी येथील मुळ रहिवासी, ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणीसम्राज्ञी मधू कांबीकर याचं पुण्यात वयाच्या ७३ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले आहे. यांच्या निधनाने मराठी कलाविश्वातील एक प्रभावी पर्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

दि.२७ नोव्हेंबर २०१६ रोजी लावणीच्या कार्यक्रमानंतर त्यांना पक्षाघाताचा (स्ट्रोक) झटका आल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मेंदूमध्ये रक्ताच्या गाठी असल्याचेही त्या वेळच्या वृत्तांत नमूद होते.त्यानंतर त्या अंथरुणावर खिळूनच होत्या.

'शापित' या चित्रपटातील त्यांच्या दमदार अभिनयाने त्यांना विशेष ओळख मिळाली. 'एक होता विदूषक', 'झपाटलेला' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. अस्सल लावणी, सहज अभिनय आणि ग्रामीण स्त्रीजीवनाचे प्रभावी चित्रण ही त्यांच्या कलेची वैशिष्ट्ये होती.




### तुळजापूरच्या आई जगदंबेची ज्योत मोगऱ्यात दाखल;भक्तिमय वातावरणात स्वागत!

माजलगाव । प्रतिनिधी

श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा संगम साधत मोगरा येथील तरुणांनी तुळजापूरच्या आई जगदंबेचे दर्शन घेऊन पायी वारी करत ज्योत गावात आणली. गेल्या पंधरा वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही उत्साहात जोपासण्यात आली. ज्योत घेऊन गावात दाखल झालेल्या तरुणांचे ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले. यामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

**पंधरा वर्षांपासून तरुणांची पायी वारीची परंपरा कायम**

**नवरात्रोत्सवानिमित्त गावात धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल**

मोगरा गावात आई जगदंबा देवीची स्थापना उत्साहात करण्यात आली असून, नऊ दिवसांच्या नवरात्रोत्सवात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तुळजापूरला पायी जाऊन देवीचे दर्शन घेणे आणि तेथून ज्योत आणणे, या उपक्रमात गावातील तरुणांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. श्रद्धेने आणि उत्साहाने पार पडणाऱ्या या वारीमुळे गावातील धार्मिक परंपरेला उजाळा मिळत आहे.

ज्योत घेऊन आलेल्या तरुणांचे स्वागत करण्यासाठी गावातील पुरुष मंडळी, महिला आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अतुल (भैय्या) पांढरपोटे, दत्ता पांढरपोटे, परमेश्वर पांढरपोटे, सूर्यकांत सातपुते, तुकाराम भोजने, तुकाराम राठोड, प्रशांत पांढरपोटे, अभिषेक पांढरपोटे, बाळासाहेब भालेकर, विनायक भालेकर, वैजनाथ खाडे, अमर आलात, रवी भालेकर, कैलास बिजुले, बाळकृष्ण शिंदे, गोविंद इंगळे आणि गोरख इंगळे यांच्यासह ग्रामस्थ व महिला भाविक उपस्थित होते.

# माध्यम स्वातंत्र्यावरील हल्ल्याचा निषेध!

## अघोषित आणीबाणीच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्त्यांची निदर्शने

बीड । प्रतिनिधी

नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांना अडवणे, त्यांना ताब्यात घेणे, पोलिसांकडून मारहाण व दडपशाही केल्याचे आरोप तसेच आंदोलनाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांशी गैरवर्तन, प्रेस कार्ड दाखवुनही ताब्यात घेऊन गाडीत टाकणे या माध्यमांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ दि.१२ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा संविधानिक अधिकार आणि माध्यम स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याचा आरोप करत,




सरकारच्या अघोषित आणीबाणीच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली.

यावेळी आंदोलकांनी 'हुकूमशाही चालणार नाही', 'लोकशाही वाचवा, देश वाचवा' आणि 'हुकूमशाही सरकार मुर्दाबाद' अशा घोषणा देत निषेध व्यक्त केला. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, भारताचे सरन्यायाधीश आणि महाराष्ट्राचे राज्यपाल यांना निवेदन सादर करण्यात आले.ङ्गनवी दिल्लीतील जंतरमंतर येथे दि. १० ऑक्टोबर २०२६ पासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थी संघटनेकडून आंदोलन सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी देशाच्या विविध भागांतून दिल्लीकडे येणाऱ्या आंदोलनकर्त्यांना रेल्वे आणि रस्त्यांवर अडवून ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला.ङ्गतसेच रेल्वे सेवा आणि मेट्रो स्थानके बंद करणे, दिल्लीतील इंटरनेट सेवा खंडित करणे आणि आंदोलनकर्त्यांवर पोलिसांकडून मारहाण व दडपशाही करणे, अशा घटनांमुळे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याच्या अधिकारावर गदा येत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.ङ्गआंदोलनाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांनाही गैरवर्तनाला सामोरे जावे लागल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. अधिकृत प्रेस कार्ड दाखवूनही पत्रकारांना बळजबरीने ताब्यात घेऊन वाहनात बसवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. पत्रकारांना निर्भयपणे वार्तांकन करता यावे, प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे आणि पत्रकारांशी सन्मानपूर्वक वागणूक दिली जावी, अशी मागणी निदर्शकांनी केली.या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, रामनाथ खोड, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, आम आदमी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, शहराध्यक्ष सादेक सय्यद, इंटकचे बीड जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके , सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे आणि ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे , प्राचार्य काम्रेड डी.जी.तांदळे , नितीन जायभाये, प्रविण आनेराव , सामाजिक कार्यकर्ते सरफराज पठाण, गणेश वटारे, माऊली शिंदे, यांच्यासह विविध क्षेत्रांतील कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## नाभिक समाजातील गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव

### नाभिक समाजातील पायल काळे,पूजा राऊत व डॉ.तनुजा भैरे यांचा केला सन्मान

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथे शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव समिती वडवणी यांच्या वतीने नाभिक समाजातील शैक्षणिक व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रावीण्य मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. या उपक्रमातून समाजातील गुणवंतांचा गौरव करण्याबरोबरच इतर विद्यार्थ्यांनाही शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी हा सकारात्मक संदेश देण्यात आला.

यावेळी कु.पायल रामेश्वर काळे (बीएमएस, लातूर), कु.पूजा परमेश्वर राऊत (जलसंपदा विभाग) आणि डॉ. कु. तनुजा बबन भैरे (फिजिओथेरपी) या तिघींचा समाजाच्या वतीने सन्मान



करण्यात आला. शिक्षण आणि विविध क्षेत्रांत त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. श्रीफळ, पुष्पहार व शाल देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

आजच्या स्पर्धेच्या युगात मुलींनी शिक्षणाच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत आपली वेगळी ओळख निर्माण करणे ही अभिमानाची बाब आहे. जिद्द, मेहनत, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर मुली प्रत्येक क्षेत्रात यश संपादन करू शकतात हे या गुणवंत विद्यार्थिनींनी दाखवून दिले आहे. त्यांच्या यशामुळे समाजातील इतर विद्यार्थिनींनाही उच्च शिक्षण घेण्याची आणि आपले ध्येय साध्य करण्याची प्रेरणा मिळणार आहे.समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करणे त्यांच्या यशाचे कौतुक करणे आणि नव्या पिढीला शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि समाजात शिक्षणाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होते. शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आलेल्या या सत्कार उपक्रमाचे समाजबांधवांकडून कौतुक होत आहे. या सत्कारप्रसंगी युवराज शिंदे, परमेश्वर राऊत, बबन भैरे, रामेश्वर काळे, जगदीश गोरे, बबन राऊत, अजय राऊत, अशोक काळे, राहुल काळे,वैभव शिंदे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

### शिरूरकासार मराठी पत्रकार परिषदेची शिरूर कासार कार्यकारिणी जाहीर
## अध्यक्षपदी गोरख खेडकर तर सचिव पदी नवनाथ सानप यांची निवड






**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख राज्याचे अध्यक्ष शिवराज काटकर यांच्या आदेशानुसार बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी शिरूर कासार तालुका नूतन कार्यकारणी जाहीर केली. पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाल संपल्यानंतर नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.शिरूर तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी गोरख खेडकर यांची तर सचिव पदी नवनाथ सानप यांची निवड करण्यात आली.

मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस यांच्या अध्यक्षतेखाली शिरूर तालुका कार्यकारिणीची बैठक होऊन या बैठकीत एकमताने अध्यक्षपदी गोरख खेडकर, सचिव पदी नवनाथ सानप, उपाध्यक्षपदी जगन्नाथ परजणे, सहसचिवपदी प्रतीक भांडेकर यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवडीचा अहवाल आल्यानंतर जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी या निवडीची घोषणा केली. या निवडीबद्दल नूतन कार्यकारिणीचे संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, हल्ला विरोधी कृषी समिती जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत आदींनी अभिनंदन केले.

## नवरात्रोत्सवानिमित्त माजलगावात युवा सेनेच्या वतीने दांडिया महोत्सवाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माजलगाव शहरात युवा सेनेच्या वतीने दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे शहरातील नवरात्रोत्सवाच्या उत्साहात भर पडणार असून, महिला, युवक-युवती आणि नागरिकांना दांडियाच्या माध्यमातून उत्सवाचा आनंद घेता येणार आहे.

माजलगाव शहरातील झेंडा चौक, जुना चौक रोड येथे या दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात दररोज सायंकाळी ६:३० ते रात्री १०:३० वाजेपर्यंत दांडियाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



नवरात्र हा भक्ती, शक्ती, संस्कृती आणि उत्साहाचा सण म्हणून ओळखला जातो. या उत्सवाच्या निमित्ताने पारंपरिक दांडियाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याचा प्रयत्न युवा सेनेच्या वतीने करण्यात येत आहे. नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या दांडिया महोत्सवाचे आयोजन अभिजीत आबा कोंबडे, युवा सेना तालुकाप्रमुख, माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

माजलगाव शहरातील नागरिक, महिला, युवक-युवती आणि दांडियाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक अभिजीत आबा कोंबडे यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण : झेंडा चौक, जुना चौक रोड, माजलगाव

वेळ : सायंकाळी ६:३० ते रात्री १०:३०

आयोजक : अभिजीत आबा कोंबडे, युवा सेना तालुकाप्रमुख, माजलगाव

# नवसाला पावणारी पारगावची जोगेश्वरी देवी

**उत्सव वार्ता । शरद रेडेकर**

आष्टी तालुक्यातील आष्टी पासून १३ किलोमीटर अंतरावर पारगाव जोगेश्वरी येथे श्री पारगाव जोगेश्वरीदेवीचे पुरातन काळापासून देवस्थान आहे. निसर्गरम्य ठिकाणी देवीचे मंदिर असून हे मंदिर सुमारे पाचशेवर्षांपूर्वीचे हेमांडपंती बांधकामाचे आहे संपूर्ण बांधकाम पूर्ण जुने असून ते अद्याप सुरक्षित आहे मंदिर आवारात गावकऱ्यांनी लोकवर्गणीतून मंदिरालगत मोठे सभागृह बांधले आहे येथे भव्य असा नगारखाना आहे मंदिराच्या चारही बाजूच्या मजबूत भिंती मंदिराच्या भव्यतेची ओळख करून देतात मंदिरासमोर मोठीझाडी असून परिसर विविध झाडांनी बेली नटलेला आहे मंदिराच्या दोन्ही बाजूस तलाव असल्याने मंदिराच्या सौंदर्यात आणखीनच भर पडत आहे यावर्षी पारगाव परिसरात

चांगला पाऊस झाल्याने हिरवेगार पिके दिसत आहेत धरणी मातेने हिरवा शालू पांघरलेला असल्याने नवरात्र उत्सवात हेविलोभनीय दृश्य देवी भक्तांना भुरळ घालणारे आहे श्री चक्रधर स्वामी है महानुभाव पंथाचे संस्थापकयांनी या परिसरात भ्रमंती केल्याची आख्यायिका आहे याठिकाणी सतीअनुसया यांनी पूजा व सार पूजा केली होती. स्थळ म्हणजे छोटे बांधलेले आहेत हावडा पारगाव जोगेश्वरी मंदिर आता हे मराठी भाषेतीलग्रंथ लीळाचरित्र येथे आहे माहीमभटाने श्री चक्रधरांची लिहिलेले ते चरित्र एकत्रितरीत्या येथे सांगितलेआहे श्री चक्रधर स्वामींनी या मंदिरा संबंधी सांगितले आहे की मंदिराच्या बाहेर एक दगडी छत्री आहेत्यांना मंदिरात जाता येत नाही ते लोक येथूनच दर्शन घेतात मंदिरांमध्ये लक्ष्मीनारायणाच्या सुंदर अशामूर्ती पूर्वाभिमुख आहे 'मंदिर कैसे निके मंदिर किती सुंदर आहे या ओळीचा संदर्भ या का निश्चितीसाठी उपयोगी पडतो चक्रधर स्वामी यांच्या पूर्वी हे मंदिर अस्तित्वात होते किमान एक हजार वर्षापूर्वीचे हे मंदिर असून हिंदूची देवी आणि महानुभव पंथाची पूजा स्थळ म्हणून ओळखले जाते मंदिराचे प्रस्तावावर बांधलेल्या रुंद भिंती सभामंडप गाभारा सगळे कसे प्रसन्न वातावरणात आहे देवीचा मुखवटा तांदळाचा असून भक्तगणांना प्रथम




दर्शनी हा मुखवटा भुरळ घालतो मंदिराच्या प्रत्येक दगडावर वेलबुट्टी नक्षीकाम आहे काही दगडावर हत्ती अश्व युद्धाचे काही प्रसंग कोरलेले आहेत या मंदिराच्या दारावर एक शिलालेखआहे. मात्र या शिलालेखाचा कुठेही उल्लेख झालेला नाही. ऊन, वारा, पाऊस यांना सामना देणारे हे मंदिर आजही चांगल्या स्थितीत उभे आहे देवीच्या साडेतीन पीठांपैकी अंबाजोगाई येथील योगेश्वरी देवीचीही उपस्थित असल्याची आख्यायिका सांगण्यात येते भक्तांच्या भक्तीला प्रसन्न होऊन भक्तगणांची इच्छापूर्ती करणारी ही जागृत देवी आहे या मंदिराच्या गाभाऱ्यात देवीचा सुंदर असाच तांदळा आहे. मूर्तीसिंहारूढ झालेली आहे देवीच्या अंगावर सोन्या-चांदीचे दागिने आहेत या मंदिरात भक्तांनी प्रवेश केलाकी मन प्रसन्न होते

मंदिर परिसरात असणारे कुंडाचे पाणी नेहमी स्वच्छ व निर्मळ असते या देवस्थान लाजाण्यासाठी आष्टीवरून नवरात्र उत्सवात आष्टी बस आगारातर्फे बसची व्यवस्था केली जाते हे देवस्थान आष्टी तालुक्यातील श्रद्धास्थान आहे. महाराष्ट्रातून येथे लाखो भाविक दरवर्षी दर्शनासाठी येतात नवरात्रमहोत्सवात देवीची पहाटे पुजा काकड आरती दुपारी तीर्थ प्रसादाचा कार्यक्रम होतो परिसरातील हजारो भक्त या उत्साहात उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. पारगाव येथील देवीचे भक्त यादरम्यान नऊ दिवसाचेउपवास करतात हे उपवास श्रद्धेतून केले जातात देवीचे मंदिर परिसरात विविध कार्यक्रमाचे आयोजन नवरात्र उत्सवात केले जाते त्यामध्ये आराधी गीत भजन कीर्तन रात्री जागर मातेश्वरी ग्रंथाचे वाचन देवीच्या ओव्या अधिक कार्यक्रम होतात देवीला प्रतिदिनी दुपारी किमान पाच हजार नागवेली पानांची माळचढविली जातो. देवीच्या मुखवट्यावर आल्यावर देवीची विलोभनीय मूर्ती भक्तजनांना अधिकच भुरळपाडून जाते. पाने भक्तगणांना प्रसाद म्हणून दिला जातो पण खाल्ल्यावर थुंकू नये असे सांगितले जाते. देवीचा होम अष्टमीच्या रात्री सुरू होऊन नवमीच्या प्रारंभी समाप्त होतो विजयादशमीच्या दिवशी पालखीची पारगाव गावातून वाजत गाजत मिरवणूक काढली जाते यामध्ये सर्व ग्रामस्थ सहभागी होतात.

## पान ६ वरून...

### माजलगाव जलाशयातून अवैध

दिवसापुरती मर्यादित राहणार नाही. भविष्यात पुन्हा अवैध पाणी उपसा सुरू होऊ नये यासाठी यापुढेही अशीच सातत्याने कारवाई चालू राहील, असा स्पष्ट इशारा पाटबंधारे विभागाकडून देण्यात आला आहे.

ही व्यापक कारवाई माजलगाव धरण प्रशासन, पाटबंधारे विभाग, महसूल विभाग, पोलीस दल आणि विद्युत वितरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आली. या धडक मोहिमेत पाटबंधारे विभागाचे उपअभियंता शितल माने, एस. एस. शेख, मधुकर जाधव, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी हंगे, पोलीस पाटील अल्ताफ शेख, पोलीस दलाचे उपनिरीक्षक (पीएसआय), विद्युत वितरण विभागाचे एस. बी. चव्हाण यांच्यासह ग्रामसेवक तसेच सर्व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने आणि सक्रियपणे सहभागी झाले होते.

### स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर

मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य तथा वरिष्ठ विधिज्ञ ड. के. एस. पंडित, ज्येष्ठ प्रा. एन. एन. साबळे, प्रा. सुनील हराळे, प्रा. कपिल कुमार बेंद्रे, प्रा. शेख फारूक, प्रा. पंकज तांदळे, प्रा. पार्थ कुलकर्णी, प्रा. अक्षय महामुनी, प्रा . गोपाल सर्वज्ञ ,प्रा. एस. एस. शिंदे, प्रा. महेश कानपाठक, प्रा. फिडेल चव्हाण उपस्थित होते. तसेच महिला प्राध्यापिका डॉ. गौरी नाईक, प्रा. विशाखा जाधव, प्रा. नबीला खातून, प्रा. रविना सवई, प्रा. मंगल जोगदंड यांच्यासह सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### असंतुष्ट कार्यकर्ते, खंबीर

पूर्वीची गती टिकवून ठेवण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना, पायाभूत सुविधांचा विकास आणि व्यापाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याची गरज आहे. त्याचबरोबर गावातील अंतर्गत रस्ते, नाल्या आणि इतर मूलभूत सुविधांचे प्रश्नही कायम आहेत. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.गावात वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि नेते आहेत. मात्र, गावाच्या विकासाच्या मुद्द्यावर सर्वांनी एकत्र येऊन प्रशासनाकडे पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन गावासाठी कोणत्या सुविधा आवश्यक आहेत, रखडलेल्या कामांना गती कशी मिळेल आणि मंजूर योजना गावातच कशा पूर्ण होतील, यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. केवळ राजकीय उपस्थिती असून उपयोग नाही, तर त्यातून गावाला प्रत्यक्ष काय मिळाले, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.चौसाळ्याचा विकास हा केवळ एखाद्या पक्षाचा किंवा नेत्याचा विषय नसून संपूर्ण गावाच्या भवितव्याशी संबंधित आहे. रखडलेले बसस्थानक, अपूर्ण विश्रामगृह, रस्ते आणि नाल्यांचे प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच गावासाठी आवश्यक असलेल्या शासकीय सुविधांसाठी ठोस पाठपुरावा करणे गरजेचे आहे. अन्यथा, बाजारपेठेचे महत्त्व असलेल्या चौसाळ्याला विकासाच्या संधी असूनही त्याचा लाभ मिळणार कधी, असा प्रश्न नागरिकांसमोर कायम राहणार आहे.

### कारखानदाराचा लालचीपणा

यावा देशामध्ये पंजाब मध्ये शेतकऱ्यांना भाव जास्त मिळतो तामिळनाडू सरकार शेतकऱ्यांना जास्त भाव देते पश्चिम महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांना जास्त भाव मिळतो मंग मराठवाड्यातील व बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उसाला भाव जास्त का मिळत नाही कागदावरचे घोडे नाचवण्यापेक्षा कारखानदाराने लालचीपणा सोडावा व शेतकऱ्याला ऊसाला चांगला भाव द्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन करण्यात आले यावेळी शेतकरी हक्का मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे ,डॉ. गणेश ढवळे, बाळासाहेब मोरे, अशोकराव येडे, हनुमानराव घोडके, रामधन जमाले, कॉम्रेड डी.जी. तांदळे,सय्यद सादेक, गणेश वटारे, अशोक सुरवसे ,बाजीराव ढाकणे, युनूस शेख, डॉ. संजय तांदळे, सर्फराज पठाण, शेख मोबीन, आदी शेतकरी उपस्थित होते.

### ऊस दरासाठी शेतकरी

ऊसतोडणी कामगारांनी कोयते चालवू नयेत, ऊस वाहतूकदारांनी वाहतूक करू नये आणि साखर कारखान्यांनी गाळप सुरू करू नये,असा निर्धार ठरावाद्वारे व्यक्त करण्यात आला. ५ हजार रुपये अंतिम दर आणि ४ हजार २५० रुपये पहिली उचल मिळावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.मागण्या मान्य न झाल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. या ऊस परिषदेला अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजन क्षीरसागर, प्रदेशाध्यक्ष कॉम्रेड उमेश देशमुख,भाई ऑड.नारायण गोले पाटील,भाई मोहन गुंड,दिपक लिपणे,अजय बुरांडे यांच्यासह विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी, साखर कारखानदारीतील धोरणे आणि ऊस दरातील तफावतीवर प्रकाश टाकला.

cmyk

# दुष्काळात पाणी, चारा, रोजगाराला प्राधान्य

## मुख्यमंत्री फडणवीस यांची जनतेला ग्वाही

नाशिक / प्रतिनिधी

दुष्काळी मदतीच्या निकषांत शेतकरी बसतो की नाही, यापेक्षा त्याच्या पिकांचे नुकसान झाले आहे का, हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे ज्या तालुक्यात आणि गावात शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे, तेथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देणारच, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. दुष्काळी परिस्थितीत कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, अशी शासनाची भूमिका आहे. दुष्काळाचा सामना करण्यासाठी पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि शेतकरी-शेतमजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याला सर्वोच्च प्राधान्य असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नाशिक येथील युथ फेस्टिव्हल मैदानावर 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.०'चा प्रारंभ आणि अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे होते. या वेळी व्यासपीठावर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण दादा भुसे, अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ, आमदार दिलीप बोरसे, डॉ. राहुल आहेर, दिलीप बनकर,





हिरामण खोसकर, नितीन पवार, देवयानी फरांदे, सरोज अहिरे, राहुल ढिकले, विवेक कोल्हे, गोकुळ गिते, आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे प्रधान सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, 'यशदा'चे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, की राज्यात दुष्काळाचा सामना करण्यासाठी बारा प्रकारच्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन केले जाणार असून, गरजेनुसार टँकर सुरू करण्यात येतील. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याबरोबरच जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यात येईल. चाऱ्याची कमतरता भासल्यास चारा डेपो सुरू केले जातील. शेतकऱ्यांनी दुष्काळामुळे जनावरे विकू नयेत, असे आवाहनही त्यांनी केले. रोजगार हमी योजनेसह विविध योजनांचे अभिसरण करून शेतकरी आणि शेतमजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जाणार आहे. कर्जमाफी योजनेचा लाभ शेवटच्या पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या वेळी जलतारा तज्ज्ञ प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ आणि ज्येष्ठ जलसंधारण कार्यकर्ते पद्मश्री पोपटराव पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अभियानाच्या पहिल्या टप्पा प्रभाविपणे राबविण्यात महत्वाच्या योगदानासाठी प्रधान सचिव एकनाथ डवले आणि यशदाचे उपसंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दरम्यान, विकसित महाराष्ट्राचे स्वप्न गावखेडी समृद्ध झाल्याशिवाय पूर्ण होणार नाही, असे ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे म्हणाले. मागील अभियानात ५६४४ ग्रामपंचायती सहभागी झाल्या. नव्या अभियानातही सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तर या अभियानाकडे पहिल्या टप्प्यात दुर्लक्ष करणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकाऱ्यांचे कान टोचत, लोकसहभाग वाढविण्यासाठी सर्वांनी सक्रियपणे काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# ठिबक सिंचनातून पाण्याची बचत

## लहान शेतकऱ्यांसाठी उपयुक्त मार्गदर्शन



ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करून शेतकरी साधारणपणे ३०% ते ५०% (काही पिकांमध्ये ८०% पर्यंत) पाण्याची बचत करू शकतात. लहान शेतकऱ्यांसाठी ठिबक सिंचनातून जास्तीत जास्त पाण्याची बचत आणि योग्य व्यवस्थापन करण्यासाठी खालील महत्त्वाचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल:

पाण्याची बचत कशी होती? थेट मुळांवर पाणी: या पद्धतीत पाणी वाया न जाता थेंबाथेंबाने थेट वनस्पतीच्या मुळाशी सोडले जाते. बाष्पीभवन आणि गळती नाही: उन्हामुळे हवेत पाण्याचे बाष्पीभवन होत नाही आणि पाणी वाहून जात नाही. तणांवर नियंत्रण: पिकांच्या दोन ओळींमधील जमीन कोरडी राहते, ज्यामुळे तण (गवत) वाढत नाही आणि पाण्याचा अपव्यय टळतो.

लहान शेतकऱ्यांसाठी प्रभावी टिप्स व नियोजन : वेळेचे योग्य नियोजन: पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि जमिनीच्या प्रकारानुसार ठिबक संच चालवण्याचा कालावधी ठरवावा. त्यासाठी कृषी विभागाचे किंवा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे 'ठिबक सिंचन शेड्युलर' (ऊेळि खीीळसरींळेप डलहशर्वीश्रशी) प किंवा मार्गदर्शन वापरावे. मल्चिंगचा (आच्छादनाचा) वापर: ठिबक सिंचनासोबत जमिनीवर प्लास्टिक मल्चिंग पेपरचा वापर केल्यास जमिनीतील ओलावा टिकून राहतो आणि पाण्याची बचत आणखी वाढते. पाण्याचे मोजमाप: उपलब्ध पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पाणी मोजून वापरावे.

ठिबक संचाची देखभाल व स्वच्छता : गाळण्यांची साफसफाई: वाळू आणि जाळीच्या गाळण्या आठवड्यातून किमान एकदा नीट धुवून साफ कराव्या. फ्लशिंग करणे: पाईपलाईन आणि उपनळ्यांचे शेवटचे टोक उघडून महिन्यातून किंवा पंधरवड्यातून एकदा फ्लशिंग करावे, जेणेकरून साचलेला कचरा निघून जाईल. ड्रिपर्स बंद होण्यापासून रोखणे: ड्रिपर्स (थेंबणारे नॉझल) बंद पडू नयेत म्हणून वेळोवेळी क्लोरिनेशन प्रक्रिया करावी। गळती होत असल्यास ताबडतोब दुरुस्ती करावी. संभाळ: हंगाम संपल्यानंतर किंवा संच वापरत नसताना उपनळ्या गुंडाळून सावलीत सुरक्षित ठेवाव्यात.

अतिरिक्त फायदे : खतांची बचत : ठिबक वाटेच विरघळणारी खते दिल्याने खतांचा अपव्यय २५% पर्यंत होतो आणि पिकांना योग्य पोषण मिळते. उत्पादनात वाढ: ओलाव्याचे योग्य समतोल राखल्यामुळे पिकाच्या गुणवत्तेत आणि उत्पादनात १० ते २५% किंवा त्याहून अधिक वाढ होते.

# झेंडूचे भाव घसरल्याने शेतकरी अडचणीत

शेतात डोलणाऱ्या झेंडूच्या फुलांनी बहरलेल्या बागा पाहून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान उमटले; मात्र बाजारात भाव नसल्याने कवडीमोल दराने झेंडूची विक्री करण्याची वेळ आल्याने फूल उत्पादक शेतकऱ्यांच्या आनंदावर विरजण पडले आहे. झेंडूच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने लागवड, खते, औषध फवारणी, मजुरी आणि तोडणीसाठी केलेला खर्चही भरून निघत नसल्याने फूल उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

यंदा चांगला दर मिळेल, या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी झेंडूची लागवड केली. बाग फुलवण्यासाठी मशागत, रोपांची लागवड, खते, पाणी, औषध फवारणी तसेच कीड-रोग नियंत्रणासाठी मोठा खर्च केला. बाग उत्तमरीत्या फुलवण्यासाठी शेतकऱ्यांनी दिवस-रात्र मेहनत घेतली. मात्र फुले बाजारात दाखल होताच अपेक्षित दर मिळत नसल्याने उत्पादन खर्च आणि बाजारभाव यांचे गणित पूर्णपणे कोलमडले आहे. झेंडूच्या बागेत फुलांचा बहर आला असला तरी बाजारभाव घसरल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. फुले तोडण्यासाठी मजूर लावावे लागतात. त्यानंतर वाहतूक आणि बाजारातील इतर खर्चही करावा लागतो. मात्र विक्रीतून मिळणारी रक्कमच तोडणीच्या खर्चापेक्षा कमी पडत असल्याने फुले तोडून बाजारात नेऊनही हातात काहीच उरणार नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी पिकाची योग्य काळजी घेतली, तरच चांगले उत्पादन मिळते. परंतु उत्पादन चांगले असूनही बाजारभावच पडला तर शेतकऱ्यांच्या मेहनतीचे चीज होत नाही. त्यामुळे यंदाचा झेंडूचा बहर उत्पादकांसाठी 'फुलला तरी फळला नाही', अशी अवस्था निर्माण करणारा ठरत आहे. खर्च मोठा; उत्पन्न मात्र तुटपुंजे : झेंडूची लागवड करण्यापासून ते फुले बाजारात नेईपर्यंत शेतकऱ्याला अनेक खर्चांना सामोरे जावे लागते. जमीन मशागत, रोपे, खते, कीटकनाशके, औषध फवारणी, पाणी, मजुरी, तोडणी आणि वाहतूक या सर्व खर्चाचा भार उत्पादकाच्या खांद्यावर असतो. बाजारभाव चांगला मिळाल्यास या खर्चातून काही प्रमाणात नफा मिळण्याची आशा असते. मात्र सध्याच्या कमी दरामुळे उत्पादन खर्चाची भरपाई होणेही कठीण झाले आहे.




# पपई लागवड तंत्रज्ञान

पपई लागवड हे कमी वेळेत आणि कमी खर्चात चांगले उत्पन्न देणारे एक महत्त्वाचे फळपीक आहे. पपईच्या यशस्वी लागवडीसाठी खालील बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे:

हवामान आणि जमीन : हवामान: पपईसाठी उष्ण व दमट हवामान उत्तम असते. अतिथंड किंवा अतिउष्ण हवामान पिकासाठी हानिकारक असते. जमीन चांगल्या निचऱ्याची, हलकी ते मध्यम काळसर जमीन लागवडीसाठी योग्य असते. जमिनीत पाणी साचून राहिल्यास खोडकुज किंवा मूळकुज हा रोग होतो. जमिनीचा सामू (कि) ६.५ ते ७.५ दरम्यान असावा.

सुधारित जाती : व्यापारी जाती: तैवान ७८६ (रेड लेडी), कुर्ग हनिड्यू, पुसा डेलीशियस, पुसा मॅजेस्टी, पुसा ड्वार्फ आणि को-२ ते को-७. विशेष पसंती: 'तैवान ७८६ (रेड लेडी)' ही जात तिच्या उत्तम उत्पादनक्षमता, गोडवा आणि वाहतुकीसाठी योग्य असल्यामुळे सर्वाधिक लोकप्रिय आहे.

लागवडीची वेळ आणि अंतर : लागवडीचा काळ: जून-जुलै (पावसाळी), सप्टेंबर-ऑक्टोबर (हिवाळी) किंवा फेब्रुवारी-मार्च (उन्हाळी).

लागवडीचे अंतर : ६ बाय ६ फूट (१.८ ु १.८ मीटर) किंवा ७ बाय ५ फूट. एका एकरात



साधारणपणे १००० ते १२६० झाडे बसतात.

खत व्यवस्थापन : सेंद्रिय खत: खड्डा भरताना प्रति खड्डा १० ते १५ किलो चांगले कुजलेले शेणखत, १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ५० ग्रॅम ट्रायकोडेर्मा मिसळावे.

रासायनिक खते (प्रति झाड दरवर्षी): नत्र (छ): २०० ग्रॅम. स्फुरद (झ): २०० ग्रॅम. पालश (घ): २५० ग्रॅम. ही खते लागवडीनंतर २रा, ४था आणि ६व्या महिन्यात समान हप्त्यांमध्ये विभागून द्यावीत.

पाणी व्यवस्थापन : ठिबक सिंचन : पपईसाठी ठिबक सिंचन उत्तम मानले जाते. यामुळे पाण्याचा योग्य वापर होतो आणि पाणी साचून राहण्याचा धोका टळतो. उन्हाळ्यात: दर २-३ दिवसांनी पाणी द्यावे. हिवाळ्यात: दर ८-१० दिवसांनी पाणी द्यावे.

रोग व कीड नियंत्रण : रिंग स्पॉट व्हायरस (विषाणूजन्य रोग): हा रोग मावा आणि पांढरी माशी यांच्याद्वारे पसरतो. उपाय: लागवडीच्या वेळी निंबोळी पेंड वापरावी. बाधित झाडे काढून नष्ट करावीत. कीड नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड किंवा ॲसिटामिप्रिडची फवारणी करावी. खोडकुज / मूळकुज: पाणी साचल्यामुळे हा बुरशीजन्य रोग होतो. उपाय: कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा मेटलॅक्सिलची झाडाच्या बुंध्याजवळ आळवणी करावी.

काढणी आणि उत्पादन : काढणी: लागवडीनंतर ८ ते १० महिन्यांत फळे काढणीस तयार होतात. फळांचा हिरवा रंग बदलून पिवळसर छटा दिसू लागल्यावर फळे काढावीत.

उत्पादन: चांगल्या व्यवस्थापनाखाली एका झाडापासून ५० ते ८० किलो फळे मिळतात. एका एकरातून ४० ते ६० टन उत्पन्न मिळू शकते.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

५४ : नीरो १७ व्या वर्षी रोमन सम्राट बनला.
१७७३ : चार्ल्स मेसियर यांनी व्हर्लपूल गॅलेक्सीचा शोध लावला.
१८८४ : लंडन शहराजवळील ग्रिनिच या गावाजवळून जाणारे रेखावृत्त शून्य मानणे या गोष्टीला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली व त्यानुसार सर्व जगाची वेळ निश्चित केली गेली.
१९२३ : मुस्तफा कमाल पाशाने तुर्कस्तानची राजधानी इस्तंबूल वरुन अंकारा येथे हलवली.
१९२९ : पुण्यातील पर्वती देवस्थान दलितांना खुले झाले. त्यासाठी सत्याग्रह झाला होता.
१९४४ : दुसरे महायुद्ध लाल सैन्याने लाटवियाची राजधानी रिगा जिंकली.
१९४६ : फ्रान्सने नवीन संविधान अंगीकारले.
१९७० : फिजीचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
२०१३ : मध्य प्रदेश मध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत ११५ जण ठार आणि ११० जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७७ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे 'गांधी-आयर्विन' कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकऱ्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (मृत्यू: ६ मे १९४६ )
१९११ : अशोक कुमार गांगुली ऊर्फ 'दादामुनी' चित्रपट अभिनेते, पद्मश्री (१९६२), दादासाहेब फाळके पुरस्कार (१९८९), ५३ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत सुमारे ४०० चित्रपटांत भूमिका केल्या (मृत्यू: १० डिसेंबर २००१)
१९२४ : भारतीय राजकारणी मोतीरु उदयम यांचा जन्म. (मृत्यू: ३१ मार्च २००२)
१९२५ : मार्गारेट थॅचर ब्रिटनच्या पहिल्या महिला पंतप्रधान (मृत्यू: ८ एप्रिल २०१३)
१९३६ : भारतीय वीणा वादक आणि संगीतकार चित्ती बाबू यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९९६)
१९४१ : जॉन स्नो इंग्लिश क्रिकेटपटू
१९४३ : सऊबर एफ १ चे संस्थापक पीटर सऊबर यांचा जन्म.
१९४८ : नुसरत फतेह अली खान पाकिस्तानी सूफी गायक (मृत्यू: १६ ऑगस्ट १९९७)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२८२ : जपानमधील निचिरेन बौद्ध पंथाचे स्थापक निचिरेन यांचे निधन. (जन्म: १६ फेब्रुवारी १२२२)
१२४० : रझिया सुलतान भारतातील पहिली महिला राज्यकर्ती (जन्म: ?? १२०५)
१९११ : मार्गारेट नोबल ऊर्फ 'भगिनी निवेदिता' स्वामी विवेकानंदांच्या शिष्या, भारतीय संस्कृतीच्या आणि स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्या मूळच्या आयरिश होत्या. २५ मार्च १८९८ रोजी स्वामी विवेकानंदांनी त्यांना विधिवत ब्रम्हचारिणी व्रताची दीक्षा दिली व त्यांचे नाव 'निवेदिता' ठेवले. (जन्म: २८ आक्टोबर १८६७)
१९३८ : पॉपॉय कार्टून चे निर्माते ई. सी. सेगर यांचे निधन. (जन्म: ८ डिसेंबर १८९४)
१९४५ : मिल्टन हर्शे 'द हर्शे चॉकलेट कंपनी'चे संस्थापक (जन्म: १३ सप्टेंबर १८५७)
१९६५ : डी. डी. टी. या पदार्थाचा अनेक कीटकांवर संपर्कजन्य विषारी परिणाम होतो या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे स्विस रसायनशास्त्रज्ञ पॉल हर्मन म्युलर यांचे निधन. (जन्म: १२ जानेवारी १८९९ ओल्टेन, स्वित्झर्लंड)
१९८७ : आभा सकुमार गांगुली तथा किशोर कुमार पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, आभिनेता व पटकथालेखक, त्यांनी सुमारे ४०० हून अधिक चित्रपटांत गाणी गायिली. 'चलती का नाम गाडी' सारख्या निखळ विनोदी चित्रपटाबरोबरच 'दूर गगन की छाँव में' सारखे गंभीर चित्रपटही काढले. (जन्म: ४ ऑगस्ट १९२९)
१९९५ : डॉ. रामेश्वर शुक्ल तथा 'अंचल' हिन्दी साहित्यिक (जन्म: १ मे १९१५ किशनपूर, फतेहपूर, उत्तर प्रदेश)
२००१ : डॉ. जाल मिनोचर मेहता कुष्ठरोगतज्ञ, नामवंत शल्यचिकित्सक, पुणे जिल्हा रेड क्रॉसचे अध्यक्ष, पद्मश्री (१९८२) 'सिरम इन्स्टिट्युट ऑफ इंडिया' चे संचालक
२००३ : नोबेल पारितोषिक विजेते केनेडियन भौतिकशास्त्रज्ञ बर्ट्राम ब्रॉकहाउस यांचे निधन.

# पिकांसाठी सल्फर किती महत्वाचे आहे

राज्यातील शेतकरी शेती करताना आपल्या पिकांना विविध प्रकारची रासायनिक खते वापरत असतात. या सर्वांमध्ये युरिया हे खत सर्वात खपाचे खत म्हणून ओळखले जाते. अलीकडेच केंद्र सरकारने शेतीसाठी सल्फर कोटेड युरियाचा वापर करण्याचे धोरण अवलंबले आहे. मात्र आता पिकांसाठी सुलफर इतके महत्वाचे का आहे? सल्फरच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नेमके काय नुकसान होऊ शकते? असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होत असतात.

उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत घसरण :कृषी संशोधकांच्या एका अहवालानुसार, पिकांना किंवा झाडांना सल्फरची कमतरता जाणवल्यास त्यांची वाढ खुंटते तसेच उत्पादनात घट दिसून येते. सल्फरच्या कमतरतेमुळे तेलबिया पिकांच्या गुणवत्तेमध्ये आणि उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत घसरण होते. सल्फरची कमतरता शेती करताना मोठी समस्या असते. मात्र, शेतीमध्ये पिके घेताना शेतकऱ्यांच्या ही बाब लक्षात येत नाही.

तेलबिया पिकांसाठी महत्वाचे :भारतातील जवळपास ४१ टक्क्यांहून अधिक जमिनीत सल्फरची कमतरता आढळून येते. भारतीय तेलबिया पिकांमध्ये सोयाबीन, मोहरी, भुईमूग, तीळ हे प्रमुख तेलबिया पिके आहेत. या पिकांसाठी संतुलित खतांचा वापर आवश्यक आहे. या खतांमध्ये प्रामुख्याने नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश, सल्फर, जस्त आणि बोरॉन ही खते आवश्यक असतात. यात तेलबिया पिकांच्या उत्पादनासाठी सल्फर हे खूप महत्वाचे खत आहे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# सतीश चव्हाण यांची मस्ती जिरवावी लागणार

## अंबादास दानवेंची टीका ; चंद्रकांत खैरेंनीही साधला चव्हाणांवर निशाणा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरमध्ये ठाकरे गटाच्या शिवसेनेच्या वतीने मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मेळावा आयोजित करण्यात आला. ठाकरे गटाचे उमेदवार दिलीप घुगे यांच्या प्रचारार्थ झालेल्या या मेळाव्याला जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आमदार सतीश चव्हाण यांच्यावर टीका करत कार्यकर्त्यांना ताकदीने निवडणूक लढण्याचे आवाहन केले. तर माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनीही चव्हाण यांच्यावर आरोप करत दिलीप घुगे यांच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला. मेळाव्यात बोलताना अंबादास दानवे यांनी निवडणुकीच्या रणनीतीवर भाष्य केले. ते म्हणाले, भाषण करून जिंकायची ही निवडणूक नाही. आपल्या जिल्ह्यात ९१ हजार मतदार आहेत, २१७ आपल्याकडे बूथ आहेत. आपण नोंदणी नाही केली तरी या शहरात २५ हजार ते ३० हजार





मतदार आपले आहेत. आपण सुद्धा संघटनेच्या माध्यमातून नोंदणी केली आहे. आपण संघटना म्हणून निवडणूक लढतोय. प्रचार करताना आपण लक्षात घेतलं पाहिजे ही मॅच काय टेस्ट नाही. आपल्या ट्वेंटी-ट्वेंटी खेळायची आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने मराठवाड्यात उमेदवार दिल्यामुळे आपण पुण्यात उमेदवार दिला, असेही अंबादास दानवे त्यांनी सांगितले. अमरावती शिक्षक आणि मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची जागा आपल्याला सुटली होती. मात्र शरद पवार यांच्या पक्षाने उमेदवार दिल्यामुळे आपणही कोल्हापूरच्या सुनील मोदी यांना उमेदवारी दिल्याचे दानवे म्हणाले. सतीश चव्हाण यांच्यावर टीका करताना अंबादास दानवे म्हणाले, समोर जो उमेदवार उभा आहे, त्याने आपल्याला खूप त्रास दिला आहे. सतीश चव्हाण यांनी गंगापूरच्या शिवसेनेला खूप त्रास दिला आहे. प्रशांत बंबने सुद्धा कधी त्रास दिला नाही, गंगापूरमध्ये आपले लोक फोडले. सतीश चव्हाणची मस्ती जिरवावी लागणार आहे. जिथं उजडेल तिथं उजडेल, आपण ताकतीने लढू. या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी एकजुटीने आणि ताकदीने प्रचार करण्याचे आवाहनही त्यांनी केले. मेळाव्यात चंद्रकांत खैरे यांनीही सतीश चव्हाण यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले, आपला उमेदवार काय लहान नाही.

मनोज जरांगे एका दिवसात मोठा झाला. दिपके एका रात्रीत मोठा झाला. आपला सुद्धा दिलीप घुगे मोठा होईल. आपला उमेदवार शंभर टक्के निवडून येणार मध्येचं तुतारीवाला घुसला. मागच्या वेळेस तीन वेळा निवडून आलेला उमेदवार कोणी निवडून आणलं, मागच्या वेळेस हाता पाया पडला माझ्या. माझ्या निवडणुकीला सतीश चव्हाण यांनी भुमरेचं काम केलं, आता त्याला नाही साफ केलं तर नाव बदलून ठेवा माझं. यावेळी त्यांनी सतीश चव्हाण यांच्या विजयासाठी आपण मदत केल्याचा दावाही केला.

# मुंगूसवाडे ग्रामपंचायतच्या आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीची मागणी!

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मुंगूसवाडे ग्रामपंचायत आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी तक्रारदार आबासाहेब नवनाथ खेडकर यांनी पाथर्डी पंचायत समिती गटविकास अधिकारी अहिल्यानगर जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्त नाशिक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे याबाबत अधिक माहिती अशी की माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९/३ अन्वये महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक यांच्याकडे अपील केले असून मुंगूसवाडे ग्रामपंचायत ग्रामसेवक जनमाहिती अधिकारी पाथर्डी पंचायत समिती यांच्याकडून माहिती अधिकार ०४/०६/२०२६ रोजी सादर केलेल्या माहिती अर्जावर विहित मुदतीत मुंगूसवाडे ग्रामपंचायत अंतर्गत विविध विकास कामांच्या प्रशासकीय मंजुरी तांत्रिक मंजुरी आदेशाच्या प्रती निविदा कार्यारंभ आदेश ठेकेदार लाभार्थ्यांचे नाव मंजूर रक्कम प्रत्यक्ष झालेला खर्च बिलांच्या प्रति मोजमाप पुस्तिका काम पूर्णत्व प्रमाणपत्र गुणवत्ता तपासणी अहवाल निधी प्राप्तीच्या नोंदी निधी खर्चाच्या नोंदी ग्रामसभा ठरावाच्या प्रती ग्रामपंचायत ठरावाच्या प्रति देयेके अदा करण्यापूर्वीची तपासणी व मंजुरी नोंदी कामाचे फोटो जिओ ट्रेकिंग फोटो अशा स्वरूपाची कोणतेही अपेक्षित उत्तर व माहिती दिली गेली नाही यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी ग्रामपंचायत ग्रामसेवक व पंचायत समिती आवक जावक यांनी विहित कालावधीत ग्रामपंचायतच्या अभिलेखाची माहिती दडवल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याची मागणी तक्रारदार आबासाहेब खेडकर यांनी केली आहे.

### मुंगूसवाडे ग्रामपंचायतमध्ये कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा संशय ?

मुंगूसवाडे ग्रामपंचायत पाच वर्षाच्या कालावधीत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय तक्रारदार आबासाहेब खेडकर यांनी व्यक्त केला आहे ज्यामध्ये ग्रामपंचायत अंतर्गत पेविंग ब्लॉक अल्पसंख्याक विभाग गावठाण मशीद रस्ता दलित वस्ती स्ट्रीट लाईट जि.प.शाळा सोलर लाईट गावांतर्गत स्ट्रीट लाईट हाय मॅक्स दिवे दलित वस्ती बंदिस्त गटार गावठाण बंदिस्त गटार ग्रामपंचायत फर्निचर खरेदी व दुरुस्ती पाणीपुरवठा योजना काम धोबीघाट बांधकाम स्वच्छ भारत अभियान शौचालय गावांतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ते खासदार निधीतून स्मशानभूमी रस्ता नदीवरील पूल अशा विविध ग्रामपंचायतच्या योजनेत कोट्यावधी रुपयांचा अपहार झाल्याचा संशय बळवला असल्याच्या तक्रारी आहेत.

### कथित रेकॉर्डिंगमध्ये ग्रामपंचायत दप्तर व पुरावे नष्ट करण्याच्या चर्चा ?

मुंगूसवाडे ग्रामपंचायतच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाच्या काही रेकॉर्डिंग मध्ये तक्रारदार आबासाहेब खेडकर यांनी आरोप केल्याप्रमाणे ग्रामपंचायत मधील एक पदाधिकारी व ग्रामसेवक यांच्यामध्ये संभाषण सुरू असताना ग्रामपंचायतीच्या आर्थिक गैरव्यवहाराचे सर्व पुरावे नष्ट करण्याचे बोलले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे यामुळे खरोखर मुंगूसवाडे ग्रामपंचायतच्या विविध विकास कामाच्या नावाखाली कोट्यावधीचा गैरव्यवहार झाला आहे का याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांना हे.८० हजार रु. नुकसान भरपाई द्या - राजेंद्र आमटे

## केंद्रीय पथकास शेतकरी हक्क मोर्चाची मागणी, कापूस व सोयाबीन खर्चाचे नांगरटी पासूनचे विवरण देऊन मागणी



बीड । प्रतिनिधी

सोयाबीन पिकाचा नांगरटी पासून ते शेतात वाळलेल्या सोयाबीन पर्यंत व कापसाच्या तिसऱ्या फवारणी पर्यंतचा एकूण खर्चाचे विवरण देऊन शेतकऱ्यांना हेक्टरी ७० ते ८० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे व सहकाऱ्यांनी केली. शेतकऱ्याचे दुष्काळामुळे अतोनात नुकसान झाले आहे शेतकऱ्याचे सोयाबीन कापूस पिकाचा नांगरट, मोगडा, पाळी, पेरणी, रेगाटी,बियाणे, खते, खुरपणी, फवारणी सोयाबीन पिकाला एकरी सुमारे २६,६०० ते ३०,००० म्हणजे हेक्टरी ६६,५०० ते ७०,०००रुपये व कापूस पिकाला सुमारे एकरी २९,५०० ते ३५,००० हेक्टर ७३,७५० ते ८०,००० अशा पद्धतीने शेतकऱ्यांना सोयाबीन व कापूस पिकासाठी हेक्टरी ७० ते ८० हजार रुपये निव्वळ खर्च आलेला आहे. केंद्रीय पाहणी पथकांनी शेतकऱ्याच्या नुकसानीचे योग्य मूल्यमापन करून शेतकऱ्याला हेक्टरी ८० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली.

शेतकऱ्यांना सोयाबीन पिकासाठी कमीत कमी हेक्टरी ६६ हजार रुपये निव्वळ खर्च आलेला आहे शेतकऱ्याला हेक्टरी ३७ ते ४५ क्विंटल सोयाबीन होते सुमारे दोन ते अडीच लाखाचे उत्पन्न होणे अपेक्षित असताना काहीही उत्पन्न झालेले नाही. कापूस पिकाला प्रतिवर्षी शेतकऱ्याला एकरी दहा ते बारा कुंटल कापूस म्हणजेच हेक्टरी २५ ते ३० क्विंटल पेक्षा जास्त कापूस होत असतो सुमारे तीन ते साडेतीन लाखाचे उत्पन्न कापसातून होणे अपेक्षित असताना शेतकऱ्याला यावर्षी काही उत्पन्न झालेले नाही. शेतकऱ्याचा नुकसानाचा विचार केलेला असताना शेतकऱ्याला झालेला खर्च व शेतकऱ्यांच्या खर्चाच्या तिप्पट रक्कम असा विचार केला असता शेतकऱ्याला हेक्टरी अडीच ते तीन लाख रुपये मिळणे अपेक्षित असताना फक्त शेतकऱ्यांना किमान शेतकऱ्याचा झालेला खर्च तरी द्यावा अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने दुष्काळी केंद्रीय पाहणीपतकाकडे करण्यात आलेली आहे. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, डॉ.गणेश ढवळे, रामधन जमले, हनुमान घोडके, भीमराव कुटे, अशोक सुरवसे,बाजीराव ढाकणे, गणेश वटारे, राम माने, शेख युनूस, बाळासाहेब मोरे, डॉ.संजय तांदळे, रमेश डोके, इत्यादी सहकाऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

# घटस्थापनेचा मुहूर्त, रविवारची सुट्टी; रेणुका, तुळजाभवानीच्या दर्शनासाठी गर्दी

## केडगावसह बुऱ्हाणनगरच्या मंदिरात भाविकांचा जनसागर

अहिल्यानगर। प्रतिनिधी

'आईराजा उदो उदो... सदानंदीचा उदो उदो' च्या जयघोषात रविवारी शहरात आणि उपनगरांमध्ये शारदीय नवरात्रोत्सवाला भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. घटस्थापनेचा पहिलाच दिवस आणि त्याला जोडून आलेली रविवारीची सुट्टी, या दुहेरी योगामुळे नगरकरांचे श्रद्धास्थान असलेल्या केडगावातील श्री रेणुका माता मंदिर आणि बुऱ्हाणनगर येथील कुलस्वामिनी तुळजाभवानी मंदिरात भल्या पहाटेपासूनच भाविकांचा अलोट जनसागर उसळला. केडगावच्या रेणुका माता मंदिरात सकाळी ८ वाजता पवित्र अभिषेक, परशुराम पूजन आणि ध्वजारोहण करून विधिवत घटस्थापना करण्यात आली. तर बुऱ्हाणनगर येथे भगत परिवाराच्या वतीने डोक्यावर सुबक घट आणि हातात भगवे ध्वज घेऊन भव्य घटशोभायात्रा काढण्यात आली.

दोन्ही मंदिरांमध्ये महाआरतीनंतर देवीच्या मूर्तींना पारंपरिक सुवर्ण व रत्नजडित अलंकारांनी मढवण्यात आले असून, फुलांची नयनरम्य आरास आणि आकर्षक विद्युत रोषणाईने मंदिर परिसर उजळून निघाला आहे. दुष्काळाचे सावट टळून बळीराजा सुखी व्हावा आणि सीमेवरील जवान सुरक्षित राहावेत, यासाठी देवीच्या चरणी साकडे घालण्यात आले. भाविकांच्या सोयीसाठी बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी मंदिरात मुखदर्शनाची वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. नवरात्रकाळात सलग २० तास भाविकांना देवीचे दर्शन घेता येणार आहे. तसेच, जे भाविक प्रत्यक्ष उपस्थित राहू शकणार नाहीत, त्यांच्यासाठी 'श्री बुऱ्हाणनगर देवी' या सोशल मीडिया



पेजवरून देवीच्या दैनंदिन दर्शनाची सोय उपलब्ध केली आहे. - अभिषेक भगत, पुजारी केडगावात पहिल्याच दिवशी झालेल्या अभूतपूर्व गर्दीच्या पार्श्वभूमीवर देवस्थान समितीने चोख व्यवस्था ठेवली आहे. पहिली, पाचवी आणि सातवी माळ या दिवशी होणारी अलोट गर्दी लक्षात घेता, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र दर्शन रांगा, तसेच वेळ वाचवण्यासाठी मुखदर्शनाची विशेष व्यवस्था केली आहे. मंदिर परिसरात २० सीसीटीव्ही, भाविकांना दर्शनात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी स्वयंसेवक आणि ४० पोलिसांचा बंदोबस्त तत्पर आहे. नवरात्रातील घट हे विश्व निर्मितीचे आणि सुफलतेचे प्रतीक मानले जाते. सप्तधान्य आणि पाण्याचा तांब्या (घट) स्थापन करून निसर्गाच्या पुनरुज्जीवनाची पूजा केली जाते. बुऱ्हाणनगर आणि केडगाव येथील देवीला चढवले जाणारे दागिने हे पेशवेकालीन व मराठाकालीन नक्षीकामाचे प्रतिनिधित्व करतात, जे वर्षातून केवळ नवरात्रोत्सवातच भाविकांना पाहायला मिळतात.

# स्थानिक गुन्हे शाखा हिंगोलीची मोठी कारवाई

## आंतरजिल्हा दुचाकी चोरटोळी गजाआड; १ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धडक कारवाई करत दुचाकी चोरी करणाऱ्या एका आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी दोघांना अटक करून त्यांच्या कडून चोरीच्या तीन दुचाकी जप्त केल्या आहेत. शहरासह जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून हिंगोली जिल्ह्यात दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले होते. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक. डॉ. श्रेणिक लोढा यांनी चोरट्यांचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला स्पष्ट निर्देश दिले होते.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि वसंत आरसेवार आणि पोउपनि माधव जिव्हारे यांच्या तपास पथकाने सर्व गुन्ह्याची माहिती घेतली. या आधारे पथकाने संशयित शेख जुनेद शेख मैमुद्दीन (रा. लक्ष्मीनगर देगलूर नाका, नांदेड) आणि अब्दुल दानीश अब्दुल रफीक ( रा. बेबडा, ता. दर्यापूर, जि. अमरावती) या दोघांना ताब्यात घेतले. यावेळी संशयीतांच्या अधिक चौकशीत त्यांनी इतर साथीदारांची नावे निष्पन्न केली.

# नवरात्र म्हणजे अंत:करणातील नकारात्मकता सोडून सदाचाराची साधना – महंत माधवबाबा

पाथर्डी । प्रतिनिधी

नवरात्र हा उत्सव केवळ बाह्य उपवासाचा नाही तर तो अंतःकरणातील आसुरी प्रवृत्तींवर दैवी गुणांचा विजय मिळवण्याचा पवित्र काळ आहे आदिमाता जगदंबा ही शक्ती आणि करुणेचे मूर्तिमंत रूप आहे आजच्या भौतिकवादी युगात मानवाने मानसिक शांतता सदाचार आणि समाधानासाठी अध्यात्माची कास धरणे अत्यंत गरजेचे आहे.

मातामाऊलीच्या चरणी लीन होताना प्रत्येकाने आपल्यातील अहंकार द्वेष आणि नकारात्मकता सोडून दिली पाहिजे समाजकल्याण परोपकार आणि एकमेकांबद्दल आदर बाळगणे हीच देवीची खरी भक्ती आहे आई जगदंबा सर्वांना सुख समृद्धी आणि सुबुद्धी देवो असे मार्गदर्शन शंकर बाबा मठाचे महंत



माधवबाबा यांनी केले शारदीय नवरात्रोत्सवाच्या पवित्र पर्वावर श्रीक्षेत्र मोहटादेवीचे मनोभावे पुजन केल्यानंतर त्यांनी भाविकांशी संवाद साधत होते यावेळी महंत माधवबाबा यांनी आदिमाता जगदंबा माता मोहटादेवीचे विधिवत पूजन केले आणि मनोभावे दर्शन घेतले यावेळी महंत माधवबाबा यांनी शंकर बाबा देवस्थानच्या वतीने मोहटा देवी देवस्थान समितीचे नव्यानेच अध्यक्ष झालेले धर्मदाय उपआयुक्त नवनाथ जगताप यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला यावेळी विश्वस्त ॲड.प्रसन्न दराडे ॲड.विक्रम वाडेकर ॲड.कल्याण बडे अशोक दहिफळे शशिकांत दहिफळे बाबासाहेब दहिफळे शुभम दहिफळे बाळूशेट लाहोटी राजेंद्र शिंदे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे उपस्थित होते.

# माध्यम स्वातंत्र्यावरील हल्ल्याचा निषेध! लोकशाही वाचवा –देश वाचवा !

## अघोषित आणीबाणीच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्त्यांची निदर्शने

बीड। प्रतिनिधी

नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांना अडवणे, त्यांना ताब्यात घेणे, पोलिसांकडून मारहाण व दडपशाही केल्याचे आरोप तसेच आंदोलनाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांशी गैरवर्तन, प्रेस कार्ड दाखवुनही ताब्यात घेऊन गाडीत टाकणे या माध्यमांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ आज दि.१२ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा संविधानिक अधिकार आणि माध्यम स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याचा आरोप करत, सरकारच्या अघोषित आणीबाणीच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली.

यावेळी आंदोलकांनी 'हुकूमशाही चालणार नाही', 'लोकशाही वाचवा, देश वाचवा' आणि 'हुकूमशाही सरकार मुर्दाबाद' अशा घोषणा देत निषेध व्यक्त केला. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत




राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, भारताचे सरन्यायाधीश आणि महाराष्ट्राचे राज्यपाल यांना निवेदन सादर करण्यात आले. नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे दि. १० ऑक्टोबर २०२६ पासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थी संघटनेकडून आंदोलन सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी देशाच्या विविध भागांतून दिल्लीकडे येणाऱ्या आंदोलनकर्त्यांना रेल्वे आणि रस्त्यांवर अडवून ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला. तसेच रेल्वे सेवा आणि मेट्रो स्थानके बंद करणे, दिल्लीतील इंटरनेट सेवा खंडित करणे आणि आंदोलनकर्त्यांवर पोलिसांकडून मारहाण व दडपशाही करणे, अशा घटनांमुळे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याच्या अधिकारावर गदा येत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलनाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांनाही गैरवर्तनाला सामोरे जावे लागल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. अधिकृत प्रेस कार्ड दाखवूनही पत्रकारांना बळजबरीने ताब्यात घेऊन वाहनात बसवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. पत्रकारांना निर्भयपणे वार्तांकन करता यावे, प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे आणि पत्रकारांशी सन्मानपूर्वक वागणूक दिली जावी, अशी मागणी निदर्शकांनी केली. या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, रामनाथ खोड, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, आम आदमी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, शहराध्यक्ष सादेक सय्यद, इंटकचे बीड जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके , सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे आणि ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे , प्राचार्य काम्रेड डी.जी.तांदळे (जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय किसान सभा बीड), नितीन जायभाये (अध्यक्ष बीड शहर बचाव मंच), प्रविण आनेराव ( जिल्हाध्यक्ष मायक्रो ओबीसी महासंघ बीड), सामाजिक कार्यकर्ते सरफराज पठाण, गणेश वटारे, माऊली शिंदे, यांच्यासह विविध क्षेत्रांतील कार्यकर्ते सहभागी झाले होते. लोकशाही मूल्ये, संविधानिक अधिकार आणि माध्यम स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे, या मागण्यांसाठी निदर्शकांनी आपली भूमिका मांडली.

# तुळजाभवानी मंदिरात साकारला जगन्नाथाचा देखणा रथ

तुळजापूर। प्रतिनिधी

शारदीय नवरात्रोत्सवाच्या घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर श्री क्षेत्र तुळजापूर येथे तुळजाभवानी मातेच्या महाद्वारासमोर जगन्नाथाचा अत्यंत देखणा व आकर्षक रथ साकारण्यात आला होता. रांजणगाव-पुणे येथील श्री तुळजाभवानी मातेचे परमभक्त तथा उद्योजक माऊली शेठ पाचुंदकर यांच्या वतीने तुळजाभवानी मंदिरात देशी-विदेशी फुलांच्या साहाय्याने ही मनमोहक सजावट करण्यात आली होती.तुळजाभवानी मातेच्या सिंहासनासह मुख्य गाभाऱ्यात, चोपदार दरवाजा, सिंह गाभाऱ्यासह संपूर्ण मंदिरात देशी-विदेशी फुलांचा वापर करून नयनरम्य सजावट करण्यात आली होती. यासाठी पुणे येथील कारागीर तब्बल दोन दिवसांपासून अथक परिश्रम घेत होते.

श्री तुळजाभवानी मंदिरात अशा प्रकारे फुलांची सजावट करण्याची पाचुंदकर कुटुंबाची ही सेवा यंदा सलग १६ वे वर्ष आहे. या प्रसंगी पाचुंदकर कुटुंबीयांनी तुळजाभवानी मातेची



साडी-चोळीची विधिवत पूजा बांधली. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थांच्या वतीने पाचुंदकर यांचा देवीची प्रतिमा देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी पाचुंदकर कुटुंबीयांसह पुजारी राम छत्रे आणि मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते. राजे शहाजी महाद्वारासमोर फोटो व सेल्फीसाठी गर्दी राजे शहाजी महाद्वारासमोर विविध फुलांच्या साहाय्याने श्री तुळजाभवानी मातेची अत्यंत आकर्षक मूर्ती आणि जगन्नाथाचा रथ साकारण्यात आला होता. ही देखणी रचना पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, या मनमोहक आणि आकर्षक मूर्तीसमोर उभे राहून फोटो तसेच सेल्फी काढण्याचा मोह भाविकांना आवरत नव्हता.

# रस्ता अर्धवट; वाहनधारक, विद्यार्थी आणि नागरिकांचा जीव धोक्यात!

## छोटेवाडी फाटा ते मोठेवाडी-आबेगाव रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील छोटेवाडी फाटा ते मोठेवाडी-आबेगाव या सुमारे सात किलोमीटर लांबीच्या महत्त्वाच्या रस्त्याचे काम गेल्या वर्षभरापासून सुरू आहे. मात्र, संबंधित कंत्राटदाराकडून अद्याप रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले नसल्याने वाहनधारक, विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत असल्याने अपघातांचा धोका वाढला असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

साईडपट्टीचे काम रखडले; वाहतुकीत अडथळे

छोटेवाडी फाटा ते मोठेवाडी-आबेगाव या रस्त्याच्या कामाला सुरुवात होऊन अनेक महिने उलटले आहेत. मात्र, रस्त्याच्या साईडपट्टीचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. काही ठिकाणी साईडपट्टी भरण्यासाठी मोठमोठे मुरमाचे दगड आणून टाकण्यात आले आहेत, तर काही ठिकाणी अद्याप काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे रस्त्यावरून समोरासमोर येणाऱ्या दोन वाहनांना बाजू देताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून, किरकोळ अपघात घडत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली.

ऊस वाहतुकीचाही प्रश्न गंभीर.

रस्त्याच्या साईडपट्टीचे काम रखडल्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसमोर ऊस वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना या मार्गावरून सुरक्षितपणे ये-जा करताना अडचणी येण्याची शक्यता आहे. याचा परिणाम शेतकरी, व्यापारी तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांवर होऊ शकतो.

### विद्यार्थ्यांचे हाल; एसटी बससेवेवर परिणाम

या रस्त्यालगत असलेल्या मोठेवाडी, हनुमाननगर, आबेगाव आणि छत्रबोरगाव येथील शेकडो विद्यार्थी शिक्षणासाठी माजलगाव येथे ये-जा करतात. मात्र,रस्त्याचे काम अर्धवट असल्यामुळे माजलगाव आगारातून या मार्गावर एसटी बस सोडली जात नसल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.परिणामी विद्यार्थ्यांना तीन ते चार किलोमीटर अंतर पायी चालत जावे लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात असून, त्यांना शैक्षणिक प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



### कंत्राटदारावर कारवाई करून काम पूर्ण करण्याची मागणी

रस्त्याचे काम दीर्घकाळापासून अपूर्ण असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय, अपघातांचा धोका आणि शेतकऱ्यांच्या वाहतुकीचा प्रश्न लक्षात घेता संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे. संबंधित कंत्राटदाराला रस्त्याचे उर्वरित काम आणि साईडपट्टीचे काम दर्जेदार पद्धतीने त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांकडून होत आहे.

संबंधित गुत्तेदार यांना वारंवार सांगुनही जाणीव पुर्वक दुर्लक्ष करीत आहेत. आता तरी प्रशासन जागे होणार का? हा प्रश्न उपस्थित होत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक असल्याचे माजी सरपंच अविनाश गोंडे यांनी सांगितले.

# माजलगाव जलाशयातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर संयुक्त पथकाची मोठी कारवाई

## ३५० मोटारी व ५० सोलर पॅनेल हटवले

बीड । प्रतिनिधी

माजलगाव जलाशयातून मंगरूळ १ आणि मंगरूळ २ या ठिकाणी होत असलेल्या अवैध पाणी उपशाविरोधात १० ऑक्टोबर २०२६ रोजी प्रशासनाच्या संयुक्त पथकाकडून मोठी धडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत अवैध पाणी उपसा करणाऱ्या तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून तब्बल ३५० पाण्याच्या मोटारी आणि ५० सोलर पॅनेल काढून टाकण्यात आले आहेत. प्रशासनाच्या या आक्रमक पावलामुळे अवैध पाणी उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

या कारवाईदरम्यान संबंधित शेतकरी आणि ग्रामस्थांना प्रशासनाकडून सक्त ताकीद देण्यात आली असून, त्यांच्याकडून यापुढे जलाशयातून कोणत्याही प्रकारचा अवैध पाणी उपसा करणार नसल्याचे लेखी आश्वासन लिहून घेण्यात आले आहे. पाण्याचे महत्व आणि धरणातील पाणीसाठा लक्षात घेता ही कारवाई केवळ एका



# कारखानदाराचा लालचीपणा शेतकऱ्यांच्या मुळावर-राजेंद्र आमटे

## साखरेचे भाव वाढले मग उसाचे भाव का वाढत नाहीत? शेतकरी हक्क मोर्चा

बीड । प्रतिनिधी

दुष्काळामुळे शेतकऱ्याचे सोयाबीन गेले आहे कापूस गेला आहे उसाचा शेतकरी तरी वाचला पाहिजे. देशात साखरेचे भाव वाढत आहे तीस-पस्तीस रुपयांनी मिळणारी साखर ६० ते ७० रुपये पेक्षा जास्त भावाने विकली जात आहे. साखरेचे भाव वाढत असताना शेतात रात्रंदिवस कष्ट करून ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला कारखाना वाढीव भाव का देत नाही. कारखानदारांनी किती खावं याचा कुठेतरी लिमिट ठेवावं तुमचा लालचीपणामुळे शेतकऱ्याचा अतोनात नुकसान होत आहे कारखानदाराचा लालचीपणा शेतकऱ्याच्या मुळावर असे शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी मांडले




शेतकऱ्याच्या कष्टाची जाणीव ठेवून कारखानदारांनी शेतकऱ्याच्या कष्टाचे योग्य मोल शेतकऱ्यांना देण्यात यावे शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल पहिला हप्ता ४२००रुपये देण्यात यावा व अंतिम हप्ता पाच हजार रुपये देण्यात यावा या मागणी करिता शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये शेतकऱ्यांना प्रति टन पहिला हप्ता ४२००रुपये व अंतिम हप्ता ५००० रुपये देण्यात

# स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयात बार कौन्सिल सदस्या ॲड. माधवी पोतदार यांचे स्वागत व सत्कार

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या सदस्या मा. ड. माधवीताई पोतदार यांनी स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयास भेट दिली. महाराष्ट्र आणि गोवा सदस्य पदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने मा .ॲड . माधवीताई पोतदार यांचे स्वागत व सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख अनिसूर रहमान व सर्व शिक्षकांच्या वतीने काण्यात आला.



सत्काराला उत्तर देताना ड. माधवीताई पोतदार म्हणाल्या, विधी महाविद्यालयाचे तसेच महाविद्यालयाच्या विद्यार्थांचे प्रश्न व अडचणी सोडवण्यासाठी मी बार काऊंसील तर्फे सर्वतोपरी प्रयत्न करील आणि वकील बांधवांच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करेल असे आस्वासन दिले . त्यांच्या या आश्वासनामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

हा कार्यक्रम महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. आमदार राजेंद्र जगताप साहेब यांच्या

# असंतुष्ट कार्यकर्ते, खंबीर नेतृत्वाचा अभाव; चौसाळ्याचा विकास खुंटला

## तहसील कार्यालय, ग्रामीण रुग्णालय दुसरीकडे; बसस्थानकाचे काम रखडले, बायपासमुळे बाजारपेठेवर परिणाम

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा हे बाजारपेठेचे आणि परिसरातील अनेक गावांसाठी महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखले जाते. मात्र, गावात विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते असूनही विकासाच्या प्रश्नांवर एकत्रितपणे आवाज उठविणारे खंबीर नेतृत्व नसल्याने चौसाळ्याच्या विकासाचा वेग मंदावल्याचे चित्र आहे. गावात अनेक राजकीय पक्षांचे कार्यकर्ते सक्रिय असले, तरी गावाच्या मूलभूत प्रश्नांसाठी एकत्र येऊन पाठपुरावा करण्याऐवजी विकासकामांकडे दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांची भावना आहे. याचा फटका गावाच्या विकासाला बसत असून, गावासाठी मंजूर झालेल्या काही महत्त्वाच्या सुविधा दुसरीकडे गेल्या, तर काही कामे अद्याप अपूर्ण आहेत.

चौसाळ्यात तहसील कार्यालय होण्याची अपेक्षा होती मात्र हे कार्यालय नेकनूरकडे गेल्याने गावाच्या दृष्टीने ही महत्त्वाची संधी हुकली. गावासाठी मंजूर असलेले ग्रामीण रुग्णालयही चौसाळ्यात साकारले नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांना आरोग्य सुविधांसाठी इतर ठिकाणांवर अवलंबून राहावे लागत आहे. गावाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या दोन्ही सुविधा चौसाळ्यात उभ्या राहिल्या असत्या, तर गावाचे महत्त्व वाढण्यासह स्थानिक पातळीवर रोजगार आणि व्यवसायालाही चालना मिळाली असती. दुसरीकडे, गावातील बसस्थानकाचे काम मागील वर्षभरापासून रखडले आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक असलेली सुविधा अद्याप पूर्ण न झाल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. नवीन शासकीय विश्रामगृहाचे बांधकामही रखडले असून, शासकीय कामकाजासाठी येणाऱ्या अधिकारी आणि नागरिकांच्या दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा आहे. एकीकडे महत्त्वाची विकासकामे अपूर्ण आहेत, तर दुसरीकडे मंजूर सुविधा गावाबाहेर जात असल्याने चौसाळ्याच्या विकासाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

चौसाळा बाजारपेठेवर परिसरातील अनेक गावांचा व्यवहार अवलंबून आहे. मात्र, गावातून बायपास मार्ग गेल्याने बाजारपेठेतील वर्दळ आणि स्थानिक व्यवहारांवर परिणाम होत असल्याची चिंता व्यापाऱ्यांकडून व्यक्त होऊ शकते. बाजारपेठेची

# बेलगाव येथे श्री क्षेत्र रेणुकाई देवीचा शारदीय नवरात्र महोत्सवाला प्रारंभ; विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील आराध्य दैवत श्री रेणुका माता मंदिरात श्री रेणुका मातेच्या कृपाशीर्वादाने सालाबादप्रमाणे यंदाही १८ व्या वर्षी शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणाऱ्या या महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, जागर आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, बेलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.



या महोत्सवानिमित्त दररोज सायंकाळी ९ ते ११ या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तने आणि विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये ह.भ.प. गौरीताई बेलेकर महाराज (आंबीजोगाई), ह.भ.प. समाजप्रबोधनकार वैष्णवीताई सुपेकर, ह.भ.प. रवि महाराज बबन काळे, ह.भ.प. शरद महाराज काळे, ह.भ.प. प्रल्हाद महाराज माळी, ह.भ.प. शिवचरित्रकार बबन महाराज समझकर यांच्यासह विविध कीर्तनकारांच्या सेवांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवादरम्यान बेलगावसह परिसरातील विविध गावांतील भाविक व दानशूर भक्तांनी अन्नदानासाठी पुढाकार घेतला आहे. सकाळचे व सायंकाळचे अन्नदान तसेच विविध दिवसांच्या कार्यक्रमांसाठी अनेक भाविकांनी सहकार्य केले आहे.

२० ऑक्टोबरला काल्याचे कीर्तन व महाप्रसाद

महोत्सवाची सांगता मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. रेणुकाताई पोकळे महाराज (बेलगावकर) यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री रेणुका मातेच्या भक्तीमय वातावरणात पार पडणाऱ्या या नवरात्र महोत्सवात भाविकांनी सहकुटुंब सहभागी व्हावे, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, बेलगाव, ता. आष्टी, जि. बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ऊस दरासाठी शेतकरी आक्रमक!

## माजलगाव मध्ये युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने उस परिषद संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

ऊसाला प्रतिटन ५ हजार रुपये अंतिम भाव आणि ४ हजार २५० रुपये पहिली उचल द्यावी, या प्रमुख मागणीसह ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर माजलगाव येथे झालेल्या ऊस परिषदेत जोरदार चर्चा झाली. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास यंदाचा गळीत हंगाम रोखण्याचा निर्धार व्यक्त करत 'कोयता बंद, वाहतूक बंद, कारखाना बंद'चा ठराव हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत एकमताने मंजूर करण्यात आला.




माजलगाव येथील जुन्या मोंढा मैदानावर युवा शेतकरी संघर्ष समिती आणि ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दि ११ ऑक्टोबर रविवार रोजी सकाळी ११:०० वाजता या ऊस परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.तालुक्यासह परिसरातील हजारो ऊस उत्पादक शेतकरी परिषदेला उपस्थित होते. ऊस दर,पहिली उचल,तोडणी व वाहतूक खर्च तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.ऊस उत्पादनासाठी लागणारे खत, औषधे,मजुरी, पाणी आणि वीज यांसह तोडणी व वाहतूक खर्चात सातत्याने वाढ होत आहे.मात्र, त्या तुलनेत ऊसाला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. उत्पादन खर्च वाढत असताना कारखानदारांकडून योग्य दर दिला जात नसल्याची भावना शेतकऱ्यांनी परिषदेत व्यक्त केली.शेतकऱ्यांना न्याय्य दर मिळेपर्यंत

# चित्रपटसृष्टीपेक्षा नानांचे समाजकार्य मोठे; दुष्काळात अनेकांचे संसार उभे केले - माजी आमदार बाळासाहेब आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राने देशाला राजकारण, चित्रपटसृष्टी, समाजकारण आणि विविध क्षेत्रांत अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वे दिली. मात्र, अलीकडच्या काळात राजकारण आणि चित्रपटसृष्टीतील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांच्या निधनामुळे महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते नाना पाटेकर यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे. नाना पाटेकर यांचे चित्रपटसृष्टीतील योगदान महत्त्वाचे असले, तरी त्यांनी समाजकार्यातून सर्वसामान्यांच्या जीवनात केलेले परिवर्तन अधिक मोठे आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्र पोरका झाला, अशा शब्दांत माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.**

शिराळ, ता. आष्टी, जि. बीड येथे दि. १२ रोजी सकाळी ९ वाजता स्वर्गीय नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत माजी आमदार बाळासाहेब आजबे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि नाना पाटेकर यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिराळ येथे नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली; जलसंधारणाच्या कामातून गावावर उपकार, नाम फाउंडेशनच्या कार्याचे स्मरण



माजी आमदार आजबे म्हणाले की, नाना पाटेकर यांचे शिराळ गावावर मोठे उपकार आहेत. गावात जलसंधारणाची कामे करताना जवळपास १५ लाख रुपयांचे डिझेल खर्च करून सलग तीन महिने काम करण्यात आले. या कामाचा लाभ शिराळ गावासह आसपासच्या परिसरातील नागरिकांना होत आहे. आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्येही नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी जलसंधारणाची महत्त्वपूर्ण कामे केली. दुष्काळाच्या काळात पाणीटंचाईने त्रस्त झालेल्या लोकांना मदतीचा हात देत त्यांनी अनेकांचे संसार उभे करण्याचे काम केले. समाजाच्या दुःखात धावून जाणारा आणि सामान्य माणसाच्या अडचणी समजून घेणारा असा अभिनेता पुन्हा होणे नाही, असेही त्यांनी नमूद केले.

नाना पाटेकर यांचे कार्य केवळ चित्रपटांपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी आपल्या कर्तृत्वातून समाजकारणातही वेगळा ठसा उमटवला. त्यांच्या कार्यातून समाजाला नेहमी प्रेरणा मिळत राहील. आज नाना आपल्यात नसले, तरी त्यांनी केलेली जलसंधारणाची कामे आणि समाजसेवेचा वारसा कायमस्वरूपी जनतेच्या स्मरणात राहील. सध्या निसर्गाच्या अवकृपेमुळे दुष्काळाचे संकट निर्माण होत असताना नानांसारख्या व्यक्तिमत्त्वाची समाजाला मोठी गरज होती, अशी खंतही आजबे यांनी व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे यांनीही नाना पाटेकर यांच्या कार्याचा गौरव केला. चित्रपटसृष्टीत काम करताना त्यांनी अनेक कलाकारांना प्रोत्साहन दिले, तसेच समाजकार्यामध्येही हिरिरीने सहभाग घेतला. त्यांच्या कार्याचा आवाका आणि व्यक्तिमत्त्वाची उंची मोठी होती. समाजासाठी योगदान देणाऱ्या अशा व्यक्तिमत्त्वाची उणीव कायम जाणवत राहील, असे शिंदे म्हणाले.शोकसभेचे प्रास्ताविक प्राचार्य आर. ए. आजबे यांनी केले, तर आभार पत्रकार अमोल जगताप यांनी मानले. नाना पाटेकर यांच्या स्मृतींना उजाळा देत उपस्थितांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲंड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26